# माणूस

शनिवार । ६ जानेवारी १९७९ । ७५ पैसे

## चरणसिंगांचे आव्हान
## शेतकऱ्यांचे आव्हान

शहरातील उद्योगधंद्यांना, त्यावर अवलंबून असणाऱ्या व्यापारी, नोकरदार आणि मध्यमवर्गीयांना, संघटित कामगारवर्गाला...

**आपल्याकडे प्रथमच दिले जात असलेले आव्हान...**

असेच आव्हान क्रांतीनंतर रशियात दिले गेले आणि स्वतंत्र शेती-शेतकरीवर्गाचा निःपात करून, सामुदायिक शेतीचा सक्तीने अवलंब करून कामगारवर्गाची, उद्योगधंद्यांची अधिसत्ता स्टॅलिनने रशियात स्थापन केली.

**आपल्याकडे स्वतंत्र शेती-शेतकरीवर्गाचे भवितव्य काय ?**

कामगार विरुद्ध शेतकरी, ग्रामीण भारत विरुद्ध शहरी भारत असा संघर्ष आपल्याकडेही उभा ठाकत आहे काय ? असल्यास या संघर्षातून बाहेर पडण्याचा मार्ग कोणता ?

**स्टॅलिनचा ? माओचा ? रुझवेल्टचा ? गांधीजींचा ? की एखादा नवाच ?**

**एक शोधप्रयत्न**

**माणूस : कामगार–किसान विशेषांक**

**नव्या वर्षाचा नवा महत्त्वाकांक्षी प्रकल्प**

**अधिक तपशील लवकरच.**

# साप्ताहिक माणूस

**वर्ष अठरावे–अंक बत्तिसावा**

६ जानेवारी १९७९

**मूल्य ७५ पैसे**

संपादक
**श्री. ग. माजगावकर**
साहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**

वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९


# इंदिरा गांधी, त्यांची अटक इ. इ.

हा लेख लिहिण्याचे एकमेव कारण म्हणजे मी इंदिराजींच्या अटकेपूर्वी आणि नंतरही दोन दिवस दिल्लीत होतो. कारण आमच्या वृत्तपत्रविद्या विभागाची शैक्षणिक सहल याच मुहूर्तावर दिल्लीला गेली होती.

शैक्षणिक सहल असली तरी आपण अशा सुमारास जात आहोत की, आपल्याला बरंच काही नाट्यमय पहायला मिळणार आहे, असं शिक्षकच नव्हे तर विद्यार्थीही म्हणत होते. पहिल्या दिवशीच म्हणजे शनिवार ता. १६ डिसेम्बरला गमतीदार अनुभव आला. चाणक्यपुरीतच उतरल्यामुळे डावी – उजवी कडे आपल्या नित्य नामपरिचयाची मंडळी म्हणजे करणसिंग, समरेंद्र कुंडु, भानु प्रतापसिंग इ. राहताना आढळली होती संध्याकाळी भटकायला निघालो तेव्हा एका चौकात डावीकडे जाणारा रस्ता विलिंग्डन क्रिसेंट रोड आहे, हे लक्षात आलं. थोडं चालून गेलो. रस्त्यावरचा दुसराच बंगला बाईंचा. १२, विलिंग्डन क्रिसेंट रस्त्यावर दोन कार्स. फाटकाच्या आत एक कार. दोन–तीन सुटातील माणसे गप्पा मारत उभी. फाटकाला लागूनच आत ऑफिसची शेड. तिथेच पहारेकऱ्यासारखा दिसणारा ओव्हरकोट घातलेला माणूस. आत जावं हे पहिल्यांदा सुचलंच नाही. आधी समोर उभं राहून काय होतं ते पाहू, असं ठरवलं; पण फाटकासमोरच बगीचात मेंदीचा सहा फूट उंच आडोसा आणि त्यावर चार फूट उंच चिकाचे पडदे. तेव्हा काही दिसणं अशक्यच. तेव्हा फार तर काय हाकलून देतील एवढंच ना, आत जाऊन तर पाहू, म्हणून फाटकाजवळ गेलो. आमच्या हालचालींवर त्या पहारेकऱ्याचं लक्ष असावं. तो स्वागताला दारात उभा. आम्ही जमेल तेवढ्या हिंदीत, दोन मिनिटं माताजींना भेटायचंय, हे त्याला सांगितलं. तो 'अंदर आव' म्हणाल्यावर आश्चर्यचकित होऊन आम्ही काय होतंय हे कळायच्या आत बंगल्यासमोर उभे राहिलो. म्हटलं, बाई सध्या रिकाम्याच दिसतायेत.

आमच्याच जवळ एक मुसलमान कुटुंब अस्वस्थ होऊन वाट पहात होतं. काही तीसपस्तीस वर्षांची माणसं हातात पेन घेऊन तय्यार होती. दोन लिडरनुमा माणसंही होती. आंध्र प्रदेशची होती, हे बोलण्यावरून कळलं. मध्येच एकदा आतली अत्याधुनिक वेषातली बायकामंडळी बाहेर पडली. वाटलं, आता...

पण आमच्यापैकी कुणालाच एवढी उत्सुकता नसावी. कारण आम्ही आपले हे कोण, ते कोण आणि काय बोलायचं, काय थापा मारायच्या (बरोबरच्यांसमोर आणि पुण्यात) हेच बोलत बसलो होतो. मुसलमान कुटुंब अधिकच अस्वस्थ झालेलं दिसलं. आमचं मराठी ऐकून त्यातील एका पुरुषानं विचारलं, 'बंबईके ?' आम्ही म्हटलं, 'नही, पूनाके.' ('पूनेके' कसंतरीच वाटलं म्हणून) मग त्याने चौकशी केली–कोण, कुठले इ. मग एक प्रश्न विचारला. तो ऐकून आम्ही आधी हादरलो आणि नंतर काय म्हणावं हे सुचणार नाही अशी माहिती त्याने आम्हाला सांगितली. त्यानं विचारलं 'बंबईमे' इंदिराजीकी बेटियाँ रहती हैं ना, मलबार हिलपर ?' हे नवीनच होतं, पण धक्क्यातून सावरून आम्ही 'नहीं तो, इंदिराजीके सिर्फ दो बेटे हैं।' असं सांगितल्यावर तो म्हणतो, 'फिर वो पंडितजीकी होंगी।' तर हे कुटुंब मुला-बाळांसह थंडीत केवळ जिज्ञासेखातर बाहेर उभं होतं.

पूर्ण व्हरांड्याला चिकाचे पडदे लावले

होते. त्यापैकी एक हालला. इंदिराजीच असाव्या, म्हणून पहारेकरी लगबगीने धावला. हिरवा शर्ट आणि जीन्समध्ये एक तरुणी अवतरली. तिने बाहेरच्या ऑफिसमध्ये काही तरी सांगितलं आणि पुन्हा आत गेली. पुन्हा बाहेर खळबळ. ही कोण? सोनिया की माणेका? शेवटी ही माणेका आहे असं ठरलं. कारण सोनिया एतद्देशीय नाही. ती होती माणेकाच; पण ती पँट-शर्ट घालत असेल, असं न वाटल्यामुळे ही खळबळ. पुन्हा पडदा सळसळला आणि 'बाई' डोकावल्या. त्यांनी समुदायाकडे नजर टाकली व एकाला आत बोलावलं. दोन–तीन मिनिटात ते बाहेर. पुन्हा बाई डोकावल्या. दुसरे आत गेले. तिसऱ्यांदा बाई आल्या आणि त्यांनी जय्यत तय्यार असलेल्याच्या हातातलं पेन घेऊन त्याने पुढे केलेल्या स्मरणिकेवर स्वतःच्या फोटोवर हिंदीत सही केली व बाकीच्यांना नमस्कार करून चौकीदाराला वह्या गोळा करायला सांगून आंध्रातल्या नेत्यांपैकी फक्त खासदाराला आत घेतलं. आमदाराला बाहेर ठेवून पडदा पडला. चौकीदारानं वह्या आत नेल्या व बाहेर आला, 'पेन दो, पेन दो' करत. संगोराम पुढे झाले. पेन घेऊन त्याने विचारलं, 'सिग्नेचर हिंदीमें होना. या इंग्रेजीमें ?' 'हिंदी', 'अंग्रेजी' असे ध्वनी निघाले. चौकीदार दोन मिनिटांनी वह्या व संगोरामांच्या पुनीत पेनसह अवतरला. हिंदी-इंग्लिश सह्या योग्य वह्यांत होत्या? शंका आली. पाहिलं तर तिथे दोन्ही सह्या होत्या! ऑफिसमधला कारकून म्हणाला की, बाई भेटतील; पण नऊ ते बाराच्या 'दरम्यान appointment ठरवून!' पण पुन्हा तिकडे फिरायला वेळच झाला नाही.

नंतर भेटले जनता पक्षाचे राज्यसभेतले खासदार. श्री. सदाशिवराव बागाईतकर! त्यांनी सांगितलं की, 'बाईंना शिक्षा होणारच! शिक्षा expulsion ची होणार. कारण बाईंनी apologetic भाषण केलं नाही. किसान रॅली पण होणार!' आणि हेच उत्तर सर्वांनी म्हणजे मधू लिमये, अडवानी, यशवंतराव चव्हाण, धारिया यांनी दिले. 'किसान रॅलीबद्दल आपलं मत काय?' तर 'होणार' किंवा 'हांगी!' लिमयांनी, 'मला मारुतीच्या जनरल मॅनेजरकडून व बाटलीवॉय कंपनीकडून माहिती मिळाली,' हे सांगितलं तेव्हा काय हा थोर बहिरजी नाईक, असा भाव आमच्यातील समाजवाद्यांच्या चेहेऱ्यांवर दाटून आला. मग अधिक महत्त्वाची अशी 'हक्कभंग प्रकरणा'ची माहिती त्यांनी सांगितली. 'मारुती'बद्दल लिमयांनी पहिला प्रश्न विचारला होता. 'मारुती कारखान्यात पन्नास लाखांची आयात केलेली यंत्रसामग्री आहे हे खरं काय?' पण हा प्रश्न सभापतींच्या कार्यालयात असा बदलला गेला की त्याचं उत्तर नकारार्थीच यावं. प्रश्न असा बदलला 'मारुती लिमिटेडच्या वार्षिक अहवालात ५० लाख रुपयांची यंत्रसामग्री आयात केली आहे, असं लिहिलं आहे काय?' उत्तर 'नाही' असं होतं आणि ते सत्य होतं! रिपोर्टात काही उल्लेखच नव्हता! पण तारांकित प्रश्नाचे तारे काढून ते प्रश्न लिखित स्वरूपात देऊन मारुतीचं आयात-प्रकरण प्रसिद्धीपासून लांब ठेवलं. प्रश्नच कामकाजातून काढून टाकले आणि शेवटी चौकशी सुरू झाली तेव्हा अधिकाऱ्यांना त्रास दिला, हा इतिहास.

इंदिराजींना अटक होणारच, असं महाराष्ट्र टाइम्सच्या श्री. अशोक जैन यांनी सांगितलं होतं. त्यामुळं सर्व मंडळी १९ ता. ला निश्चितपणे ४-३० च्या सुमारास खरेदीसाठी लालकिल्ल्यासमोरच्या बाजारात भटकत होती. तरी पण उत्सुकता होतीच. म्हणून 'इंदिरा गांधीको शिक्षा' असं ओरडत फिरणाऱ्या पोराकडून 'बंदोबस्त' नावाचं सायंदैनिक घेतलं. सनसनाटी म्हणजे काय ते तेव्हा कळलं. सकाळच्याच वर्तमानपत्रातील 'आज निर्णय होणार' ही बातमी होती; पण अनेक वेळा वाचूनही ह्या पत्राचे मत काय ते कळत नव्हते. तेव्हा ते केवळ वृत्तपत्र आहे, मतपत्र नव्हे, असं कोणी तरी म्हणालं; पण त्यामुळं ज्यांनी अंक विकत घेतले होते त्यांचे चेहरे काही खुलले नाहीत; मग सनसनाटीवर कुरबुर होऊन सुरत लुटावी तशा पद्धतीने खरेदी सुरू झाली. मध्येच मला बातम्याही ऐकायला मिळाल्या – ६ वाजताच्या. मग खरेदी संपल्यावर 'अरे हो, बातम्या ऐकल्या का? मग झालं नं expulsion?' असं होऊन लिमयांना भेटायला निघालो. शहरात वातावरण तंग वगैरे काही वाटलं नाही. बातमी ऐकून दुकानदार गिऱ्हाइकांकडे व गिऱ्हाइकं दुकानांकडे वळली होती.

दुसऱ्या दिवशी सर्वत्र इंदिराविरोधी व जनताविरोधी पोस्टर्स आढळली. ता. १९ ला राज्यसभेत कमलापतींचे राज्यसभेतील गोंधळाचे शांत सुरातील समर्थन व 'इंदिराजी जेल गयी थी। हम भी जेल जाकर आये हैं। जेलसे हम डरते नहीं। इंदिराको जेलमें भेजा तो बीसों लाख लोग जेल जाएँगे, मगर सरकारका काम नहीं चलने देंगे।' हे ऐकलं होतं. दिल्लीत फक्त १५०० लोक प्रतिबंधात्मक अटकेत, अशी बातमी वर्तमानमानपत्रात होती.

ता. २० आमच्या शैक्षणिक सहलीच्या निमित्ताने महत्त्वाची होती. D A V P, PI, B इ. संस्थांच्या भेटीत दिवस गेला. फक्त एका ठिकाणी निदर्शने पाहिली. श्री. सुरजितसिंग बर्नाला ह्यांच्या निवासस्थानासमोर 'फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया' असा बॅनर घेऊन घोषणा देत १०० लोक उभे होते.

रात्री बनारसच्या विमानहरणाची बातमी कळली. त्यामुळे मग दुसऱ्या दिवशी इं. काँ. वाल्यांच्या अंगात ऊत्र येऊन त्यांनी २१ ला थोडीशी गडबड केली; पण त्या दिवशी सुद्धा आमच्या मंडळींची सहलीचा शेवटचा दिवस म्हणून आणि पुन्हा दिल्लीला येणं होतं की नाही कुणास ठाऊक म्हणून करोलबागेत विनाअडथळा खरेदी चालूच होती! 'दिल्ली दूर है' हेच खरं! पुण्याहून आणि दिल्लीहूनसुद्धा!'

– वसंत कागलकर


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य वहा रुपये

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

मुंबई वार्ता

विनय सहस्रबुद्धे

# □ नानी पालखीवाला

मुंबईतील इंडियन कौन्सिल ऑफ वर्ल्ड अफेअर्स या संस्थेच्या वतीने गेल्या गुरुवारी (दि. २८) भारताचे अमेरिकेतील राजदूत श्री. नानी पालखीवाला यांच्या व्याख्यानाचा एक बहारदार कार्यक्रम पार पडला. सी. सी. आय. च्या मैदानावर झालेल्या या प्रगट कार्यक्रमाला तुफान गर्दी जमली होती. कोणत्याही राजकीय नेत्याचे वा राजकीय विषयावरील भाषण नसतानाही जमलेली गर्दी हे श्री. पालखीवाला यांच्या लोकप्रियतेचे द्योतकच होते.

'राजदूत म्हणून माझे अनुभव' हा या भाषणाचा विषय होता; पण प्रत्यक्षात मात्र आंतरराष्ट्रीय परिस्थितीपासून अमेरिकेतील भारतीयांपर्यंत विविध विषयांवर पालखीवाला यांनी मौलिक भाष्य केले. प्रभावी इंग्लिश आणि तितकेच प्रभावी वक्तृत्व यामुळे पालखीवालांचे हे भाषण श्रवणीय तर झालेच; पण त्यांनी जे काही सांगितले त्यामुळे ते अधिक मननीय ठरले.

भाषणाच्या प्रारंभीच त्यांनी अमेरिकेच्या परराष्ट्रधोरणात भारताला महत्त्वपूर्ण स्थान असल्याचे सांगितले. १९७८ मध्ये अध्यक्ष कार्टर यांनी भारताला भेट दिली व या भेटीत भारतीय सौहार्दाची जी जाणीव त्यांना झाली त्याने ते भारावले होते.

'अमेरिकन इतिहासकार आणि राजनीतिज्ञांनाही भारतीय उपखंडातील स्थैर्य व शांततेसाठी आणि मुख्य म्हणजे लोकशाही तत्त्वप्रणाली टिकविण्यासाठी भारतच महत्त्वाची कामगिरी बजावू शकेल असे वाटते. अमेरिकन काँग्रेसच्या परराष्ट्र धोरणविषयक समितीने सादर केलेल्या एका अहवालात भारत म्हणजे केवळ एक विशाल व शक्तिशाली राष्ट्र नसून ते जागतिक राजकारणात हळूहळू पण निश्चितपणे एक वरचढ राष्ट्र बनत आहे' अशी माहिती नानी पालखीवाला यांना दिली.

आपल्या भाषणात त्यांनी अमेरिकन जीवनाची धावती ओळख करून दिली. 'अमेरिकन काँग्रेसचे सदस्य स्वतःकडे कधीच मोठेपणा घेत नाहीत. आपण खूप महत्त्वाचे आहोत अशा थाटात ते कधीच वावरत नसतात' असे सांगून ते म्हणाले, 'भारतातून तिथे गेल्यावर हा अनुभव मला खूपच सुखद वाटला.' अमेरिकन राजकारणी विनोदबुद्धी जागृत ठेवून वावरतात त्यामुळे कटु टीकाही सुसह्य होते. शिवाय अभ्यासू आणि बुद्धिमान तरुण अमेरिकन राजकारणात मोठ्या संख्येने आहेत आणि राजकारण हे राजकीय नेत्यांचे उपजाविकेचे साधन बनलेले नाही, या दोन गोष्टींमुळे अमेरिकन लोकशाहीचे भवितव्य उज्ज्वल आहे.

अमेरिकेने तंत्रज्ञानात जी प्रगती केली आहे त्याचीही श्री. पालखीवाला यांनी मुक्तकंठाने प्रशंसा केली.

अमेरिकेचा राष्ट्रीय खेळ कोणता? बास्केटबॉल, फुटबॉल किंवा बेसबॉल यापैकी कोणताच नाही. श्री. पालखीवाला म्हणाले की, 'एकमेकांवर खटले भरणे' हा अमेरिकनांचा राष्ट्रीय खेळ आहे. छोट्या छोट्या कारणांसाठी परस्परांना कोर्टात खेचण्यात अमेरिकनांना आनंद मिळतो. एखाद्या समारंभाला येतो म्हणून सांगायचे व प्रत्यक्षात जायचे नाही यासारख्या अपराधांबद्दलही काही जण खटले भरतात. अलीकडेच एका २४ वर्षीय तरुणाने आपल्या आई-वडिलांनी आपले नीट पालन-पोषण केले नाही याबद्दल त्यांच्यावर खटला भरला होता.

अमेरिकेतील नोकरशाही हा त्यांच्या भाषणातला एक महत्त्वाचा विषय होता. भारतात काय किंवा अमेरिकेत काय, नोकरशाही व त्यामुळे सरकारी कामात येणारी दिरंगाई यात फारसा फरक नाही. 'सर्वच नोकरशहांकडे ज्ञानाऐवजी माहिती आणि कल्पकतेऐवजी बुद्धिमत्ता अधिक असते' असे सांगून ते म्हणाले, 'अमेरिका हे संपन्न राष्ट्र आहे त्यामुळे दिरंगाई वा अपव्यय अमेरिकेला परवडेल; पण भारताला परवडणार नाही!'

नोकरशाहीप्रमाणेच भारताला भेडसावणारे अन्य काही प्रश्न अमेरिकेसमोरही आहेत. अनेक अयोग्य किंवा अपात्र व्यक्ती, भ्रष्टाचारासाठी कुप्रसिद्ध होऊनही संसदेवर निवडून येतात असा आपला अनुभव आहे. अमेरिकन मतदार भारतीय मतदारांपेक्षा अधिक सुशिक्षित व सुज्ञ आहे; पण असे असूनही ज्यांना न्यायालयाने गुन्हेगार ठरविले अशा अनेक व्यक्ती अमेरिकन काँग्रेसवर निवडून आल्या आहेत. अगदी अलीकडे भ्रष्टाचाराबद्दल सजा झालेले पाच गुन्हेगार अमेरिकन काँग्रेसचे सन्माननीय सदस्य झाले आहेत.

श्री. पालखीवाला यांनी अमेरिकेतील भारतीयांबद्दलही आस्थापूर्वक माहिती सांगितली. अमेरिकेत किमान २५ दशलक्ष भारतीय आहेत. मुख्य म्हणजे भारतीय बुद्धिमत्तेचा प्रचंड साठा या गरीब, अप्रगत देशापासून दूर तिकडे अमेरिकेत आहे. बुद्धिमंतांपैकी अनेकजण विविध क्षेत्रांत मौलिक कामगिरी करीत आहेत. डॉ. मदनलाल खुराणा यांनी तर नोबेल-पारितोषिक मिळविले आहे. अन्य एक वैज्ञानिक डॉ. सुदर्शन यांचीही या पारितोषिकासाठी शिफारस झाली आहे. डॉ. चंद्रशेखर हे नामवंत शास्त्रज्ञ आणि संगीतकार झुबिन मेहता अमेरिकेत ख्यातनाम आहेत.

'जागतिक कीर्तीची ही भारतीय माणसे भारतात यायला, या मायभूमीची सेवा करण्यास उत्सुक आहेत. फक्त नोकरशाहीचे लगाम व राजकीय नेत्यांचा हस्तक्षेप यापासून त्यांची मुक्तता व्हायला हवी' असे सांगून श्री. पालखीवाला म्हणाले की, आजही आपले सरकार या वैज्ञानिकांची ही मागणी मान्य करू शकत नाही ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे.

भारतात बुद्धिमत्ता नाही असे नाही; पण तिचा योग्य व संपूर्ण उपयोग केला जात नाही ही गोष्ट महत्त्वाची आहे. श्री. पालखीवाला म्हणाले की, शिक्षण, संघटन, शिस्त भारतीयांकडे असेल तर भारत जगातील सर्वाधिक शक्तिशाली राष्ट्र होऊ शकेल.

या विधानाच्या पुष्टयर्थ त्यांनी दिलेलं उदाहरण बोलकं आहे. श्री. पालखीवाला यांनी अमेरिकेतील सेसना येथील विमानाच्या कारखान्यास भेट दिली तेव्हा भारतातील बंगलोरच्या कारखान्यात आंतरराष्ट्रीय करारानुसार काम करून आलेले दोन इंजिनियर्स त्यांना भेटले. कारखाना पाहून झाल्यावर पालखीवाला यांना त्यांना

विचारले की, 'बंगलोर व सेसना येथील कारखान्यांत तुम्हाला कोणता फरक आढळतो ?' ते इंजिनियर्स म्हणाले की, दोन्ही ठिकाणी सारख्याच उच्च दर्जाची यंत्रसामुग्री वापरण्यात आली आहे. तसेच दोन्ही ठिकाणी काम करणारे कर्मचारी गुणवत्तेत सारखेच आहेत. फरक इतकाच की, सेसना येथे दहा हजार कर्मचारी दर वर्षी फक्त पाच हजार विमाने बनवितात तर आपल्याकडे पस्तीस हजार कर्मचारी दरवर्षी फक्त ५०० विमाने बनवितात !

हे उदाहरण बघितल्यावर शिक्षण, संघटन व शिस्त या त्रयीची आवश्यकता अधिकच पटते.

याच भाषणात श्री. पालखीवाला म्हणाले की, अमेरिका व रशिया यांच्यानंतर इंजिनियर्स व शास्त्रज्ञांच्या संख्येत भारताचा क्रमांक लागतो. आज भारतात ३/४ जनता निरक्षर आहे, तरीही आपला क्रमांक तिसरा आहे. उद्या जर सारी जनता साक्षर झाली तर आपले बुद्धिवैभव किती दैदीप्यमान असेल ! ◻

## ◻ 'मुंबई बंद' –चेष्टेचा एक प्रकार

'देश की नेता' श्रीमती इंदिरा गांधी यांना संसदेचा हक्कभंग केल्याबद्दल तुरुंगात पाठविल्यानंतर त्याच्या विविध प्रतिक्रिया देशात विविध ठिकाणी उमटल्या.

कलकत्त्याहून दिल्लीला येणारे विमान पळवून नेल्याची घटना ही त्यातली एक महत्त्वाची घटना.

आत्तापर्यंत अंतर्गत राजकारणाशी संबंधित अशा कारणावरून भारतीय विमान पळविण्याचा प्रकार कोणी केला नव्हता. तसा तो झाला त्यामुळे भारतीय राजकारणात विमान व उतारू ओलीस ठेवून मागणी मान्य करून घेण्याचा नवा प्रकार सुरू होणार असे अनेकांना वाटले असेल. हा वाईट प्रकार आहे व त्याची गंभीर दखल घेतली पाहिजे असेही अनेकांना वाटले असणार; पण राजकारणाच्या धकाधकीत न पडणाऱ्या तुम्हा-आम्हा नागरिकांना कोणता प्रकार कोणत्या चौकटीत बसवायचा याचे कसे बरे आकलन होणार ? परवा श्रीमती गांधी सुटून आल्यावर त्यांनी या प्रकाराचे पोरखेळ किंवा चेष्टा म्हणून वर्णन केले तेव्हा कुठे डोक्यात लख्ख प्रकाश पडला.

म्हणजे 'राजकारणातील वाईट प्रथा' वगैरे नसून हा निव्वळ चेष्टेचाच प्रकार होता तर ! इंदिरा काँग्रेसचा हिंसेवर विश्वास नाही तेव्हा त्या पक्षाच्या अध्यक्षा म्हणतात ते खरेच, नाही का ? बरोबर, हा चेष्टेचाच प्रकार होता.

बाकी इंदिरा काँग्रेसची मंडळी भारीच चेष्टेखोर ! मद्रास, बंगलोर, आर्वी, भोपाळ, अहमदाबाद इ. सर्वत्रच या निष्पाप निरागस काँग्रेस युवकांनी निषेध म्हणून चेष्टेचे विविध प्रकार हाताळले.

२४ डिसेंबरच्या रविवारी त्यांनी मुंबई बंद ठेवून मुंबईकरांची चेष्टा करण्याचा घाट घातला. काही ठिकाणी ह्या खटयाळ युवकांनी बस्ट बसेस व अन्य खाजगी वाहनांच्या चाकांतील हवा काढून बसड्रायव्हर व उतारूंची चेष्टा केली; पण या चेष्टेला न जुमानता बेस्टच्या काही बसेस वाहतूक करीतच होत्या. 'मुंबई बंद'ची चेष्टा रविवारी होणार आहे हे माहीत होते तर खरे म्हणजे बसवाहतूक चालू ठेवण्याचा आग्रह धरायचा कशासाठी ? शिवसेनेचे नगरसेवक मोहन सावंत यांनी विचारलेला हा प्रश्न योग्यच आहे. बससेवा सुरू आहे हे पाहिल्यावर या चेष्टेखोर तरुणांनी दगडफेक केली, १३० बसेसची नासधूस केली, आठ बसेस पूर्णतः निकामी झाल्या तर त्यात त्यांचे काय चुकले ? चेष्टेला वाव न देता बससेवा बंदच ठेवायला हवी होती !

चेष्टेचे हे वारे त्या दिवशी पोलिसांनाही लागले होते. अशी काही गडबड झाली तर पोलिस एरवी लाठीमार, अश्रुधूर इ. काही तरी वापरतातच. त्यात पुन्हा आदल्याच दिवशी शरद पवारांनी हिंसाचाराची गय केली जाणार नाही असे ठणकावून सांगितले होते; पण मुख्यमंत्र्यांचे हे ठणकावणेही बहुधा चेष्टेतच असावे. त्यामुळे पोलिसांनीही गंमत बघत उभं रहाण्याची चेष्टा सुरू केली. मुंबईकर जनतेची अशी चेष्टा होत होती; पण त्यांनी निवडलेल्या जनता आमदारांपैकी फक्त एक चेष्टेखोरांना आवरत होता. अर्थात त्यालाही चेष्टेचा प्रसाद मिळाला ते वेगळेच !

हा चेष्टेचा प्रकार खरं म्हणजे नागरिकांनी व मुख्य म्हणजे पत्रकारांनी समजून घ्यायला नको का ? लागले आपले तक्रार करायला !

कुणी एकाने तर ह्या चेष्टेखोर युवकांना आवरण्यासाठी थेट गृहराज्यमंत्री भाई वैद्य यांनाच फोन करून तक्रार नोंदविली. तरीही प्रेक्षकांची भूमिका घेण्याची पोलिसी चेष्टा सुरूच ! एकाने तर (चेष्टेतच) बोलून दाखविले की गृहराज्यमंत्र्यांना आमची तक्रार ही चेष्टाच वाटली की काय ?

काही जनता आमदारांनी या पोलिसी चेष्टेची चौकशी करण्याची मागणी केली आहे. चौकशी म्हटली की आयोग आलाच. जनता राजवट आहे, तेव्हा कदाचित असा एखादा आयोग नेमला जाईलही. निदान त्या आयोगाने तरी चेष्टेची चौकशी करताना चौकशीची चेष्टा करू नये म्हणजे मिळवली ! ◻

तीन राजहंस प्रकाशने

आणि ड्रॅगन जागा झाला

अरुण साधू । चवदा रुपये

फिडेल, चे आणि क्रांती

अरुण साधू । सात रुपये

पूर्णिया

अनिल अवचट । सहा रुपये

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

# आंतरराष्ट्रीय बालकवर्ष १९७९

१९७९ हे वर्ष आंतरराष्ट्रीय बालकवर्ष म्हणून साजरं होतंय; पण नुसती 'वर्ष' साजरी केल्याने प्रश्न सुटत नसतात. इथल्या आर्थिक आणि सामाजिक समस्यांचाही या संदर्भात पुन्हा एकवार विचार होणं आवश्यक आहे. अन्यथा ३१ डिसेंबर १९७९ सालीही परिस्थिती फारशी बदललेली नसेल.

**लता भिसे**

भारताच्या पहिल्या पंतप्रधानांचा जन्मदिन भारतात बालकदिन म्हणून साजरा होतो. पंतप्रधानांना गोऱ्यागोमटया, गोजिरवाण्या, टोमॅटोच्या गालांच्या, गुटगुटीत बाळसेदार बालकांची मोठी आवड होती. त्यांच्या बालकप्रेमाला देशांच्या सीमांचं बंधन नव्हतं. साता समुद्रापलीकडच्या देशातल्या मुलांना ते हत्ती सुद्धा पाठवायचे; पण नेहरूंच्या कारकीर्दीत नियोजनाच्या काळातच हजारो शेतकरी भूमिहीन झाले. या शेतकऱ्यांची मातीचा रंग घेऊन आलेली मुलं शहरात येऊन कप-बशा विसळून गुजराण करू लागली. या आणि अशा अनेक मुलांची शाळा हिसकली गेली. दारिद्र्याच्या रेषेखाली जगणाऱ्या कुटुंबातील हजारो मुलं खरूज, टायफॉइड, जुलाब, उलटया, आंधळेपणा, बहिरेपणा, अपंगत्व घेऊन गुजराण करीत होतीच. आरोग्यविषयक सोयी, सवलती त्यांच्यापर्यंत पोहोचल्याच नाहीत. तरीही नेहरूंच्या बालकप्रेमाला जगात तोड नाही असं म्हटलं जातं. १९७४ साली संसदेत जाहीर केलं गेलं की, बालकं ही राष्ट्राची मोठी संपत्ती आहे आणि त्यानुसार ताबडतोब १५ कलमी कार्यक्रमही जाहीर करण्यात आला.

एकदा एखादी गोष्ट संपत्ती म्हणून जाहीर केली की, चोरापोरी जाऊ नये म्हणून तिला जपायचे अनेक कार्यक्रम आलेच ! ते सुद्धा अनेक योजना तयार करणाऱ्या देशातले हे कार्यक्रम ! महत्त्वाची गोष्ट म्हणजे या संपत्तीची आपल्याकडे वाण नाही ! या संपत्तीत जगात आपला दुसरा नंबर लागतो, असं जागतिक आकडेवारी सांगते. त्यामुळे या संपत्तीला महत्त्व आलेच !

देशातल्या बालकांसाठी, त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी, त्यांच्या निकोप वाढीसाठी, आपल्या देशात चिक्कार योजना आहेत असं सरकारी कागदपत्र सांगतात... बाळंतपणाच्या सोयी उपलब्ध आहेत. बालवाडयांचे कार्यक्रम आहेत. पावडरच्या दुधाची योजना आहे. मुलांच्या मानसिक संगोपनासाठी कार्यक्रम आहेत. बालगुन्हेगारांचं पुनर्वसनही केलं जातं... रिमांडहोम्स आहेत. मोफत शाळा आहेत...

आणि जबरदस्ती झालेला कुटुंबनियोजनाचा (आता कुटुंबकल्याणाचा) कार्यक्रमही आहे. मुलांना चांगलं शिक्षण आणि चांगला आहार, पोटभर जेवण मिळावं म्हणून कुटुंबनियोजन करा, असं गल्लोगल्ली लावलेली पोस्टर्स सांगतात. या विविध योजनांसाठी प्रशिक्षित अधिकारी आहेत, भरपूर पैसे आहेत...

शिवाय बालकामगारांसाठी कायदे सुद्धा आहेत. तमाम बालकांसाठी भारत जणू नंदनवन आहे...

१ जानेवारी १९७९ पासून आंतरराष्ट्रीय बालकवर्ष सुरू होत आहे. बालकांच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष होऊन वरवरच्या मलमपट्टया करण्यात १९७९ मध्ये पैसा खर्च होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सुदृढ बालकांच्या स्पर्धा, खेळ, वक्तृत्वस्पर्धा, निबंधस्पर्धा, चित्रकलास्पर्धा अशा कार्यक्रमांबरोबरच देशातल्या इतर बालकांच्या आरोग्य, शिक्षण, त्यांचं शोषण याचा विचार करायला हवा. कारण बालकांचा प्रश्न ते ज्या कुटुंबात आहेत त्या कुटुंबांचा आहे... एका विशिष्ट आर्थिक सामाजिक परिस्थितीत तो निर्माण झाला आहे. म्हणून बालकांच्या प्रश्नांकडे केवळ बालकांचा प्रश्न म्हणून पाहिले जाऊ नये. कारण त्या प्रश्नाशी इतर मूलभूत प्रश्नांचा जवळचा संबंध आहे. दारिद्र्य, अज्ञान, बेकारी या प्रश्नांचाच बालकांचे प्रश्न हा भाग आहे. त्यामुळे बालकवर्षाकडे, बालकांच्या विविध प्रश्नांकडे गांभीर्याने पाहिलं जावं. अशी वर्षं साजरी करण्यानं प्रश्न सुटत नसतात. 'महिलावर्ष' साजरे करण्याने महिलांचे प्रश्न सुटले ? नाही. तसेच बालकांचे प्रश्न इथल्या अर्थव्यवस्थेत मूलभूत बदल झाल्याखेरीज सुटणार नाहीत. त्याला अनुकूल अशी परिस्थिती बदल झाल्यावरच निर्माण होईल असे भान ठेवूनच बालकवर्षाच्या निमित्ताने विविध सामाजिक, आर्थिक समस्यांचा विचार व्हावा. भारतात विविध बालकल्याणयोजना असूनही त्यांची व्यवस्थित अंमलबजावणी होत नाही. देशातलं दारिद्र्यही वाढतं आहे. देशातल्या बालकांची आरोग्य आणि शिक्षणविषयक परिस्थिती अत्यंत भीषण आहे. बालककल्याणाच्या विविध योजना आणि बालकांना संपत्ती मानणं या दोनही गोष्टी आणि बालकांचं आरोग्य आणि शिक्षणविषयक परिस्थिती पाहिल्यावर बालकांची क्रूर चेष्टा केली जाते असंच म्हणावं लागतं.

## खरूज-नायटा, टायफॉइड-कॉलरा आणि धनुर्वाताने जप्त केलेली संपत्ती.

बालकांना संपत्ती मानून संसदेमध्ये मोठ्या अभिमानानं जाहीर

केलेल्या, कागदोपत्री बालकांचं नंदनवन असलेल्या **या देशात बालमृत्यूंचं प्रमाण जगात सर्वांत जास्त आहे.** आजपर्यंत इतर कोणत्याही विकसित-अविकसित-अविकसनशील देशांना आपण हा उच्चांक मोडू दिलेला नाही. भारतात दर हजारी १२५ बालमृत्यू होतात. हे सुद्धा शहरी भागात ! ग्रामीण भागात हे प्रमाण मोठं असण्याची शक्यता नाकारता येत नाही. भारतात १५ वर्षांहून कमी वयाच्या मुलांची संख्या २३० लाखांहून जास्त आहे. यामध्ये जगात आपला दुसरा नंबर लागतो. बालमृत्यू सोडल्यास इथल्या अमूल्य संपत्तीचं खरोखर रक्षण होतं का, याचाही शोध घ्यायलाच हवा. भारतातली बहुसंख्य बालकं कष्टकरी-कामगारवर्गातील आहेत. कामगार-कष्टकरीवर्गाच्या अर्धपोटी आयुष्याबद्दल, १०×१० च्या त्यांच्या खुराड्याबद्दल, त्यांच्या वस्तीत हजारांच्या लोकसंख्येला अर्धा तास थेंब थेंब पाणी देणाऱ्या नळांबद्दल. आजूबाजूला ड्रेनेज वाहतंय आणि मध्ये झोपडीचं बेट आहे त्या परिस्थितीबद्दल, त्याला मिळणाऱ्या कमी वेतनाबद्दल परत परत लिहायलाच नको ! पण हे वास्तव समजून घेतल्याशिवाय बालमृत्यू होण्यात आपली कार्यक्षमता आणि बालकांच्या खरूज, नायटा, टायफॉइड, कॉलरा, धनुर्वात, न्यूमोनिया, गजकर्ण, बहिरेपणा, आंधळेपणा, डोळे येणे अशा बालरोगांबद्दल काहीच समजणार नाही. याबरोबरच फसलेल्या बालकल्याणाच्या आणि जनतेच्यासाठी आरोग्ययोजनांचा विचार करायला हवा.

४०% बालमृत्यू ५ वर्षे वयाच्या आतल्या मुलांचे आहेत. या मृत्यूला प्रमुख आणि महत्त्वाचं कारण आहे, अपुरा आहार-अपुरं पोषण ! हैद्राबादच्या नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ न्यूट्रिशनने ७०१० गरीब कुटुंबांची पहाणी केली. या पाहणीत बरेच धक्कादायक निष्कर्ष बाहेर आले. यांपैकी निम्म्या कुटुंबांत ५ वर्षांखालील ३ हून जास्त मुलांचा मृत्यू झाला होता. ३५% कुटुंबांत १ ते ३ मुलं गेलेली होती. १९५१ साली देशातले ३५% मृत्यू ४ वर्षे वयाखालच्या मुलांचे होते. १९७१ सालीही यामध्ये फारसा फरक पडला नव्हता. भारतातील लक्षावधी कुटुंबं दारिद्र्यरेषेखालचं जीवनमान जगताहेत. बेकारी आणि अर्धबेकारीने ६/६ ७/७ माणसांच्या कुटुंबांना ग्रासलं आहे. अशा परिस्थितीत आई गर्भारशी असताना तिला भरपूर अन्न मिळत नाही, म्हणून मूल जन्मतःच काही विकृती घेऊन जन्मतं. त्याचं वजन कमी असतं आणि यातून जगलं-वाचलं तर पुढे अपुऱ्या अन्नामुळं मृत्यू त्याच्यावर केव्हाही झडप घालतो! देशात सर्वसामान्य माणसाला स्वस्त व चांगली व तातडीची वैद्यकीय सेवा उपलब्ध होऊ शकत नाही. एक तर स्त्री पहिली कळ येईपर्यंत पोट भरण्यासाठी काम करत रहाते. यामध्ये कामाच्या प्रचंड ताणाने तिची तब्बेत इतकी बिघडलेली असते की, खूपदा जन्मतः मूल मेलेलं असतं! अज्ञान, अंधश्रद्धा, वैद्यकीय सेवेचा अभाव यामुळे बाळंतपणानंतर हलगर्जीपणा होतो. गंजलेल्या ब्लेडनं, पत्र्याच्या तुकड्यानं किंवा दगडांनी ठेचून नाळ कापली जाते. आईला आणि मुलालाही धनुर्वात होतो. बरीच मुलं धनुर्वातानं दगावतात. ग्रामीण भागामध्ये हे प्रमाण मोठं आहे. बालमृत्यूंमध्ये मुलींचं प्रमाण जास्त असतं. याचं कारण म्हणजे स्त्रीकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन ! लहान मुलगी आजारी पडली तर याच दृष्टिकोनामुळे तिला औषधोपचार होत नाहीत. अज्ञान, निरक्षरता, आईची अशक्त तब्येत आणि वेळेवर उपलब्ध होऊ न शकणारी वैद्यकीय सेवा, अपुरं वेतन यामुळे बालमृत्यूंमध्ये आपण सर्व देशांना मागं टाकलं आहे. गरीब कुटुंबात एकूण उत्पन्नाच्या ८० ते ९०% उत्पन्न अन्नावर खर्च होतं आणि यापलीकडे जाऊन जास्त पैसे अन्नावर खर्च करणं त्यांना शक्य नसतं. घरातील स्त्री आणि लहान मुलं यांच्या वाट्यालाच कमी अन्न येतं आणि यामुळं अशक्तपणा, जीवनसत्त्वांचा अभाव स्त्रिया व मुलांमध्ये जास्त दिसतो. बालमृत्यूचं प्रमाण कष्टकरीवर्गात मोठं आहे. ह्यामधील मूलभूत प्रश्न आर्थिक-सामाजिक मागासलेपणाचा आहे. कुटुंबाचे आर्थिक उत्पन्न कमी असले की, प्रत्येकाच्या वाट्याला थोडेच अन्न येते. थोड्या अन्नामुळे अपुरे पोषण आलेच. परिणामकारक बालआरोग्ययोजनाही या परिस्थितीत राबवता येणं शक्य असतं; पण भारतात नोकरशाहीनं बालआरोग्ययोजनेत सुद्धा स्वतःचा पराक्रम करून ठेवलाच आहे. देशात विविध बालआरोग्यकल्याणयोजना असूनही त्या बालकांपर्यंत पोहोचलेल्या नाहीत. भ्रष्टाचार, दिरंगाई, अकार्यक्षमता याचा बालकांवर मात्र फार अनिष्ट परिणाम होतो. लहान मुलांमधील अंधत्व थांबविण्यासाठी १९७० मध्ये 'व्हिटॅमिन ए कार्यक्रम' घेण्यात आला. वर्षातून दोनदा डोस देण्याचं ठरलं. या कार्यक्रमाचं लक्ष्य तेरा लाख मुलांना 'ए 'व्हिटॅमिनचा डोस देणं हे होतं; पण प्रत्यक्षात चार लाख मुलांनाच हा डोस दिला गेला. जो सेंटर्स होती तिथे 'ए 'व्हिटॅमिन धूळ खात पडून राहिलं. त्या वर्षी बारा हजार मुलं आंधळी झालीच ! मुलांना पोषक आहार म्हणून पावडरचं दूध दिलं जातं. या दुधाच्या पावडरचा अपहार करून ती बाजारात विकल्याच्या अनेक घटना सर्वज्ञात आहेतच. अपुऱ्या पोषणामुळे शारीरिक दुर्बलता आलेल्या बालकांना परदेशात धट्टाकट्टया निरोगी मुलांना तयार केलेली औषधं-गोळ्या पचत नाहीत. गुण येत नाही, डॉक्टर महागडा, सरकारी दवाखान्यात उपायाला उशीर अशा अनेक कारणांनी देव-देवस्की आणि बुवा-भगताकडे इथली जनता जाते. पोराच्या खरजेवर, हगवणीवर, तापावर कोंबडं कापलं जातं. हे भीषण वास्तव इथल्या अमूल्य मानल्या गेलेल्या संपत्तीबद्दलचं आहे. श्रीमंत बायकांसाठी हॉस्पिटल्स आहेत; पण कष्टकरी वर्गातली स्त्री अजूनही ओल असलेल्या जागेत बाळंत होते, कामाचे दिवस असतील तर दुसऱ्या दिवशी कामाला जाते. बालमृत्यूचं प्रमाण एवढं नसतं तरचं नवल !

बालकवर्षाच्या निमित्तानं बालकल्याणाच्या विविध योजनांची, कार्यक्रमांची अंमलबजावणी सर्वप्रथम करून घेतली पाहिजे. त्याचबरोबर बालवाड्या, फिरती पाळणाघरं याचाही विचार केला पाहिजे. देशातलं बालमृत्यूंचं प्रमाण, स्त्रियांना मिळणाऱ्या आरोग्यविषयक सोयींचा अभावच उंच मान करून ज्यांनी बालकांना राष्ट्राची बहुमोल संपत्ती मानलेल्यांचं बालकांकडे झालेलं दुर्लक्ष दाखवतो.

## शिक्षण

शिक्षणाची संधी मिळणं हा प्रत्येक मानवाचा मूलभूत हक्क आहे. शिक्षणाची समान संधी प्रत्येकाला मिळाली पाहिजे असा आपल्या घटनेचाही आग्रह आहे आणि त्याला उद्देशून अशी समान संधी

**पृष्ठ १९ वर**

# जनता पक्ष

## वृद्ध नेत्यांना निवृत्त करा !

### वा. दा. रानडे

जनता पक्षाची एकजूट टिकणार की भंगणार ? ही अनिश्चित परिस्थिती किती काळ चालू ठेवायची ? नव्या वर्षाच्या पहिल्या महिन्यातच त्यासंबंधी अंतिम निर्णय लागणार असून आता त्यासाठी फार काळ थांबावे लागेल असे दिसत नाही. जनता पक्ष माझ्या मुलासारखा आहे असे चरणसिंग म्हणत असले तरी पक्षातील मतभेद मिटविण्यासाठी एक फेब्रुवारीपर्यंतची मुदत त्यांनी दिली आहे. ती आता अधिक वाढवायची नाही असा निर्धार आता जनता पक्षाच्या नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी करायला हवा. जनता पक्षाचे अधिवेशन मार्चमध्ये भरणार आहे. त्यात सर्व मतभेदांचा व वादग्रस्त प्रश्नांचा निर्णय लागून पक्षाचे कार्य नव्या निर्धाराने सुरू होईल अशी आशा कितपत बाळगता येईल ?

जनता पक्षाच्या नेत्यांतील भांडणांचा जनतेला आता वीट आला आहे. जनता पक्ष हे जनतेने निर्माण केलेले हत्यार आहे. गेले वर्ष दीडवर्ष नेत्यांतील भांडणातच गेले. पहिला प्रश्न मोरारजीभाई, चरणसिंग आणि जगजीवनराम या तीन नेत्यांनी एकमेकांशी जुळवून घेण्याचा आहे. त्यांचे काही ग्रह आणि आग्रह एवढे ठाम आहेत की, ते सोडायला त्यांची तयारी नाही ! मोरारजीभाई कांतिलालवरील आरोपांच्या चौकशीस तयार नाहीत. मंत्र्यांचा एक गट या प्रश्नाचा अभ्यास करीत आहे व त्यातून काय मार्ग काढता येईल हे सुचविणार आहे. हा लेख प्रसिद्ध होईपर्यंत त्याबाबतचा निर्णय कदाचित झालेलाही असेल. तो निर्णय काहीही असो; पण वरिष्ठ पातळीवरील भ्रष्टाचार प्रकरणांच्या चौकशीची काही तत्त्वे निश्चित करायला हवीत. आरोप निश्चित स्वरूपाचे आणि प्रथमदर्शनी सबळ वाटले पाहिजेत हे मान्य; पण हे ठरवायचे कोणी ? दर वेळी सुप्रीम कोर्टाच्या सरन्यायाधिशांना यात कशासाठी ओढावयाचे ? लोकपाल–बिल पास करून ती यंत्रणा कार्यान्वित का केली जात नाही ? याबाबतीतील विलंब कोणत्याही दृष्टीने समर्थनीय नाही. दुसरी गोष्ट ज्या मंत्र्याच्या नातलगावर भ्रष्टाचाराचा आरोप असेल त्याने त्यापासून पूर्णपणे दूर राहून त्याच्या चौकशीसंबंधीच्या निर्णयात सहभागी व्हावयाचे नाही. कांतिलाल देसाईसंबंधात मोरारजीभाईंनी काहीही मत द्यावयाचे नाही. निर्णय मंत्रिमंडळाने घ्यावयाचा व तो त्यांनी मान्य करायला हवा. हीच गोष्ट चरणसिंगांची-पत्नी व जावयावरील आरोपांबाबत आणि जगजीवनराम यांच्या मुलांवरील आरोपांबाबत.

वृद्ध नेत्यांनी वास्तविक निवृत्त होणे हाच सर्वांत चांगला मार्ग. त्यांनी सरकारमध्ये व पक्षात कोणतीही महत्त्वाची अधिकारपदे न स्वीकारता फक्त सल्लागाराची भूमिका घ्यावी. चरणसिंगांना परत मंत्रिमंडळात घेण्यापेक्षा मोरारजीभाई आणि जगजीवनराम यांनीही मंत्रिपदे सोडावी म्हणजे सध्याच्या पेचप्रसंगाचे कारणच नाहीसे होईल. सध्याच्या पेचप्रसंगावर हाच तोडगा मला अधिक योग्य वाटतो. मोरारजीभाई व जगजीवनराम मंत्रिपदातून निवृत्त झाल्यावर आपल्यावर अन्याय झाला अशी तक्रार करायला चरणसिंगांना जागा राहणार नाही. मोरारजीभाई व जगजीवनराम या गोष्टीला तयार होतील का ? मनाचा हा थोरपणा त्यांनी दाखवायला हवा. त्यांनी स्वेच्छेने निवृत्त होणे हे सर्वांत चांगले; पण तसे करण्याची त्यांची तयारी नसेल तर पक्षाच्या अधिवेशनात यासंबंधी निर्णय व्हावा. दुसऱ्या फळीच्या नेतृत्वाने आता सरकारची व पक्षाची जबाबदारी घ्यावी. पुण्याच्या भेटीतील एका भाषणात दुसऱ्या फळीच्या नेतृत्वाचा हा विचार वाजपेयी यांनी बोलून दाखविला. दुसऱ्या फळीचे नेते वृद्धनेतृत्वाविरुद्ध बंड करणार अशा बातम्या गेले काही महिने उठत आहेत; पण त्यांच्या राजिनाम्याच्या धमक्या म्हणजे फुसका बारच ठरला. राष्ट्रपती संजीव रेड्डींनी म्हटल्याप्रमाणे त्यांच्यात राजिनामा देण्याचे धैर्य नाही असे तरी म्हटले पाहिजे किंवा या धमक्यांचा उपयोग त्यांनी दडपण म्हणून केला असे म्हणावे लागेल. धैर्य नाही म्हणण्यापेक्षा दडपणाचाच उद्देश राजिनाम्यांच्या धमक्यांमागे होता, असे म्हणणे वस्तुस्थितीस अधिक धरून होईल. आपल्या राजिनाम्यांच्या धमकीने तरी वृद्धनेते आपसातील भांडणे मिटवितील असे त्यांना वाटले होते; पण तसे घडले नाही. हे दडपणाचे तंत्र आहे हे वृद्धनेत्यांनीही ओळखले आहे. त्यामुळे त्याला ते फारसे महत्त्व देत नाहीत. वृद्धनेत्यांनी निवृत्त व्हावे असे ठराव पक्षपातळीवर सर्वत्र पास करावेत आणि अधिवेशनात तसा ठराव मांडावा. दुसऱ्या फळीच्या नेत्यांनी देशभर दौरा करून कार्यकर्त्यांच्या व सभासदांच्या मेळाव्यात ही भूमिका विशद करावी. बहुसंख्य सभासदांचा व कार्यकर्त्यांचा या योजनेस पाठिंबा मिळण्यास काही अडचण येईल असे वाटत नाही.

संसदीय जनता पक्षातील बहुसंख्य सभासदांचा पाठिंबा मोरारजीभाईंना आहे व तेच त्यांचे बळ आहे. संसदीय पक्षाने मला नेता निवडले आहे. त्याने माझ्यावर अविश्वास दर्शविला तरच मी नेतेपदावरून दूर होईन, अशी भूमिका मोरारजीभाई घेतील याबाबत असे म्हणता येईल की, अंतिम निर्णयाच्या दृष्टीने पक्षाची मध्यवर्ती समिती आणि खुले अधिवेशन याच सर्वश्रेष्ठ संस्था त्यांचे निर्णय संसदीय पक्षावरही बंधनकारक जाहेत. मध्यवर्ती समिती अजून अस्तित्वातच आलेली नाही. पक्षाच्या निवडणुका झाल्यावर ती अस्तित्वात येईल. निवडणुकांनंतर लागलीच अधिवेशन भरणार असल्याने अधिवेशनातच यासंबंधी निर्णय घेतला गेला तर तो अधिक प्रातिनिधिक स्वरूपाचा होईल. दुसऱ्या फळीच्या नेतृत्वाने त्या तयारीस आता लागावे.

जनता पक्षात निरनिराळ्या हितसंबंधांचे गट एकत्र आले असल्याने त्या पक्षाकडून फार मोठ्या क्रांतिकारक कार्यक्रमाची अपेक्षा करता येणार नाही; पण जनतेचा पाठिंबा टिकविण्याच्या दृष्टीने इंदिरा कॉंग्रेसच्या राजवटीपेक्षा जनता सरकार निश्चित चार पावले पुढे आहे अशी प्रतिमा जनमनात ठसायला हवी. जयप्रकाशजींचे संपूर्ण क्रांतीचे उद्दिष्ट गाठण्यासाठी निष्ठावंत कार्यकर्त्यांना अखेर वेगळी संघटनाच उभारावी लागणार आहे. जनता पक्षाकडून ती अपेक्षा करता येणार नाही. देशात पुनः लोकशाहीची प्रस्थापना केली हेच त्याचे ऐतिहासिक कार्य आणि तीच त्याची मर्यादा; पण म्हणून त्याचे महत्त्व कमी नाही. लोकशाहीच्या पायावरच समाजवादाची इमारत आपणास उभी करायची आहे. □

परराष्ट्रीय घडामोडी । चंद्रशेखर पुरन्दरे

# पुन्हा एकदा स्पॅनिश सहारा

## अल्जीरिया आणि मोरोक्को

दि. २७ डिसेंबरला अल्जीरियाचा अध्यक्ष हुआरी बूमेदिन इहलोक सोडून गेला! गेली तेरा वर्षे अल्जीरिया म्हणजे बूमेदिन, असे समीकरण रूढ झालेले होते. आता बूमेदिन पटावरून गायब झाल्याने अल्जीरियाच्या अन्तर्गत परिस्थितीत फारसा फरक पडण्याची शक्यता नसली तरी अल्जीरिया आणि मोरोक्को यांच्या संबंधावर काय परिणाम होतो हे पाहणे अभ्यसनीय आहे.

### पार्श्वभूमी

१९५४ पासून सुरू झालेल्या गनिमी युद्धामध्ये १९६२ ला अल्जीरिअन जनतेने फ्रान्सची सत्ता उलथून टाकली. १९६२ च्या जूनमध्ये सत्तास्पर्धा सुरू झाली. बेन खेद्दा विरुद्ध बेन बेला असा दोन प्रमुख नेत्यांत संघर्ष सुरू झाला. त्या वेळी बूमेदिन बेन-बेलाच्या बाजूने होता. सुमारे महिनाभर ही रस्सीखेच चालली आणि बेन बेला सत्तेवर आला. सत्तेवर आल्यावर तीनच वर्षे तो कारभार करू शकला. त्या वेळी म्हणजे ६४–६५ च्या दरम्यान 'तिसऱ्या' जगाचे नेहरूंनी काढलेले खूळ मूळ धरत होते आणि आपआपला राजकीय स्वार्थ साधण्यासाठी निरनिराळी राष्ट्रे त्यांचा वापर करीत होती. "दुसरी बांडुंग' अल्जीअर्स या अल्जीरियाच्या राजधानीत भरवायचे घाटत असतानाच बूमेदिनने अकस्मात तडाखा मारून रक्तहीन सत्तांतरामध्ये बेन बेलाला पदच्युत केले. बेन बेलाच्या मंत्रिमंडळात बूमेदिन संरक्षणमंत्री होता. दिनांक १९ जून १९६५ ला तो सत्तेवर आला. त्याच्या मृत्यूपर्यंत तोच देशाचा अध्यक्ष होता आणि संरक्षणखातेही त्याच्याकडेच होते. तेरा वर्षांच्या काळात त्याने देश चांगल्यापैकी मजबूत केला; परंतु अल्जीरियाचा जागतिक राजकारणाशी संबंध हा मॉरिटेनिया आणि स्पॅनिश सहाराच्या संबंधातच येतो.

### मोरोक्को

ईशान्य आफ्रिकेत सहारा वाळवंटाच्या उत्तरेला मोरोक्को आणि अल्जीरिया येतात. त्यांच्या दक्षिणेला मॉरिटॅनिया हा देश. मॉरिटॅनियामध्ये पोलिसॅरिओ ही गनिमांची चळवळ कायम चालू आहे आणि मोरोक्को त्याला विरोध करत आहे. मोरोक्कोचे नऊ हजार सैनिक मॉरिटॅनियामध्ये आहेत. फ्रान्सची पुरेशी मदत या सैन्याला आहे तरीही पोलिसॅरिओ टिकून आहे. याचे कारण म्हणजे अल्जेरियाची मदत.

मोरोक्को हे एक अरब जगतातील वैशिष्टचपूर्ण राष्ट्र आहे. तिथे ऑक्टोबर १९७७ पासून संसदीय लोकशाही अस्तित्वात आली. तिथे प्रमुख चार राजकीय पक्ष आहेत. बर्बर पार्टी या नावाने ओळखली जाणारी मूवामाँ पोप्युलेर नावाची खेडचापर्यंत पोचलेली पार्टी आणि एक स्वतंत्र पक्ष यांची युती सध्या सत्तेवर आणि अहमद उस्मान हा या स्वतंत्र पक्षाचा पूर्वीचा अध्यक्ष सध्या पंतप्रधान आहे. बुद्धिवंतांची मानली जाणारी सोशॅलिस्ट पार्टी आणि पूर्वीच्या कम्युनिस्टांची एक पार्टी या विरोधात आहेत. नुकतेच संसदेचे अधिवेशन तहकूब झाले. राजा हसन याच्या मर्जीवरच संसद किती यशस्वी होईल हे अवलंबून आहे. कारण इतर दोन अरब देश–बहारिन आणि कुवेतमध्ये चालू असलेले संसदीय लोकशाहीचे प्रयोग १९७५ आणि १९७६ मध्ये अनुक्रमे बंद पडले. सध्या या नव्या प्रयोगात मोरोक्को मश्गुल आहे. तिसऱ्या जगामध्ये अल्जेरिआला जे स्थान आहे त्यावर टीका करायला मोरोक्को नेहमीच उत्सुक असतो. अल्जीरिआत एकपक्षीय हुकूमशाही आहे. बेन बेलाने व्यक्तिप्रधान राजकारण केले म्हणून बूमेदिनने व्यक्तिप्राधान्य वगळण्याचा प्रयत्न केला; पण त्यामुळे तो स्वतः आणि त्याच्या हाताखालचे आठ जणांचे मंडळ एवढ्यांची उमरावशाहीच वस्तुतः अंमलात आली. सध्या अध्यक्ष निवर्तल्यामुळे हेच मंडळ राज्यकारभार चालवत आहे. ही उमरावशाही हे मोरोक्कोचे प्रमुख लक्ष्य असते.

### सद्यःस्थिती

मृत्युपूर्वी चाळीस दिवस बूमेदिन 'कोमा'-मध्येच होता. तेव्हापासून मोरोक्कोने सीमेवर गडबड सुरू केली आहे. एकवीस डिसेंबरच्याच वृत्तानुसार मोरोक्कोने शस्त्रांचे तीन प्रचंड साठे (सुमारे ३ टन) पॅरॅशूटस्‌मार्फत अल्जीरियाच्या किनाऱ्यावर टाकले असे अल्जीरियाचे म्हणणे आहे. मोरोक्कोमधील सरकारवर असंतुष्ट असणाऱ्या तद्देशीयांना त्या सरकारविरुद्ध फूस लावण्याचे काम अल्जीरिया ज्या उत्साहाने करीत आलेला आहे, त्याचेच प्रत्युत्तर मोरोक्को अल्जीरियात असंतोष माजवून देत आहे. हे आधुनिक बेल्जिअम आणि फ्रेंच शस्त्रांचे साठे अल्जीरियात खळबळ माजवण्याच्याच उद्देशाने पाठवले असावेत असा संशय घेण्यास पुरेशी जागा आहे.

त्यात गोंधळ म्हणून बूमेदिनने स्वतःचा वारस नेमलेला नाही. आठ जणांचे जे मंडळ देशावर राज्य करते तेच नवा अध्यक्ष निवडील. बूतेफ्लिक या परराष्ट्रमंत्र्याचे बाहेर देशात चांगले वजन आहे; परंतु अजून संदिग्धच परिस्थिती असल्याने निश्चित काही तर्क करता येत नाही. त्यामुळे मोरोक्कोने सुरक्षिततेच्या नावाखाली परत फौजफाटा गोळा केला आहे. अल्जीरिआला अन्तर्गत प्रश्नही त्रासदायक होत असल्याची चिन्हे आहेत. या देशाच्या राजवटीला निश्चित लेबल लावता येत नाही; पण एकपक्षीय राजवट आणि त्यावरही मिलिटरीचे वर्चस्व तरीही समाजवाद, अशी परिस्थिती आहे. प्रेस सरकारच्याच नियंत्रणाखाली आहे. प्रचारमाध्यमातून वारंवार प्रतिक्रांतिवाद्यांपासून सावध रहा, असे इशारे देण्यात येत आहेत. त्या अर्थी आतमध्येही सत्तेसाठी रस्सीखेच जोरदाररीत्या चालू असावी असे दिसते.

त्या विभागातीलच लिबिया हा अल्जीरियाचा दोस्त. लिबियाचा कर्नल गद्दाफी हा अतिउत्साही माणूस आहे. आपल्या देशापेक्षा

पृष्ठ १६ वर

# रचना आणि संघर्ष । दोन आघाड्या

## गोंडा ( उत्तरप्रदेश )

### नानाजींच्या ग्रामोदय प्रकल्पाची सुरुवात

**३१ ऑक्टोबर**

मुंबई सोडल्यापासून पुऱ्या एकतीस तासांनी इथं लखनौला येऊन पोचलोय ( ३१ ऑक्टोबर ). हा देश केवढा पसरलाय हे नुसतं पुस्तकी वर्णनावरून कळत नाही हे मात्र खरं महाराष्ट्राची हद्द ओलांडायलाच लेकाचे अकरा तास लागले ! त्यानंतर जवळजवळ नऊ-साडेनऊ तास मध्य प्रदेश आणि उरलेला वेळ उत्तर प्रदेश. बरं, एवढं करूनही उत्तर प्रदेश संपलेला नाहीच ! इथून बलरामपूरला जायचं म्हणजे सहा-साडेसहा तासांचा प्रवास आहे म्हणे !

**१ नोव्हेंबर**

आज दिवसभरात हे राजधानीचं शहर बरंचसं पाहून झालं. अनेकांना भेटलोही. लक्षात एवढंच आलं की, कॉंग्रेस जाऊन जनता राजवट आलेली असली तरी प्रत्यक्षात फरक काहीच पडलेला नाही. कॉंग्रेसींची सरंजामी वृत्ती, चमचेगिरीचा सुळसुळाट आजही आहे. फरक झाला आहे केवळ व्यक्तींपुरता. लेबल तेवढं बदललंय. दारूच काय, बाटलीसुद्धा तीच आहे......आता झोपायला हवं. उद्या सकाळी बलरामपूरला निघायचंय !

**३ नोव्हेंबर : जानकीनगर**

परवापासून इथे डेरा आहे. हा थोडासा उलटाच फेरा झाला. लखनौलाच कळलं असतं तर बलरामपूरला पुढे जाऊन मग परत इथे येण्याचा उपद्व्याप करावा लागला नसता; पण तरी काही बिघडलं नाही म्हणा ! बलरामपूरला कधी तरी जावं हे लागणारच होतं.

इथे येताना अनेक प्रश्न मनात घेऊन आलो होतो. सत्तेच्या राजकारणातून बाजूला झाल्यानंतर रचनात्मक कार्यासाठी हा गोंडा जिल्हा नानाजींनी निवडल्यानंतर बरंच ऐकायला मिळत होतं. नानाजींच्या म्हणण्याप्रमाणे तर हा भारतातला एक अत्यंत मागासलेला जिल्हा. पाच वर्षांनंतर संपूर्ण जिल्ह्यात एकही कुटुंब दारिद्र्यरेषेखाली असणार नाही, असलं स्वप्नील वाटणारं आव्हान स्वीकारून नानाजी इथं आलेले. तेव्हा हा 'मागासलेला' जिल्हा आणि नानाजींचा प्रकल्प बघायची उत्सुकता फार होती......गेल्या दोन दिवसांपासून बघतोय, फिरतोय, ऐकतोय......

...मला वाटलं होतं तेवढा हा जिल्हा मागास वाटत नाही. विकसित नाहीच, हे खरं आहे; पण तरीसुद्धा 'मागासलेला' म्हणवत नाही. कारण मागासलेपणाचा संबंध अज्ञानाशी, अडाणीपणाशी जोडावा लागेल आणि इथल्या गरिबातल्या गरीब, निरक्षर खेडुतालासुद्धा 'अडाणी' म्हणायची हिंमत माझ्यात उरलेली नाही. ह्या लोकांचं राजकारणाचं, चालू घडामोडींचं ज्ञान कमालीचं अप-टू-डेट आहे. ह्यांचं राजकीय भान आमच्या सुशिक्षित मराठी माणसाकडेही पडायला मिळत नाही. ह्यांना वाचता यायचं नाही; पण चरणसिंगानं मोरारजींवर कोणते आरोप नव्याने केले आहेत हे त्यांना बरोबर माहीत असतं. मी मुंबईतून आलोय हे कळताच पहिला प्रश्न विचारला जातोय. चिकमगळूरबद्दल ! आजच कटऱ्याला गेलो होतो. शंभर घरांचं गाव नसेल; पण तिथंही चर्चा चिकमगळूरची... राजकारण चघळण्यात हे पठ्ठे कमालीचे रंगून जातात ! कशाला यांना 'मागासलेले' म्हणायचे ? केवळ खायला मिळत नाही म्हणून? पूर्ण जिल्ह्यात 'उद्योग' म्हणवण्याच्या लायकीचे फक्त एकोणीस-वीस कारखाने आहेत म्हणून ? की २५ लाख लोकसंख्येपैकी फक्त १४% जनता साक्षर आहे म्हणून ?... विकासाचे वारे इथवर पोचले नाहीत एवढंच खरं आहे. गेल्या तीस-बत्तीस वर्षांत इथे काहीच 'घडलेलं' नाही. कोणी घडवायचा प्रयत्न केलायसंही दिसत नाही. सत्तेचाळीस साली जे लोक खपाटीला गेलेलं पोट कुरवाळत, अंगाखांद्यांवरची लक्तरं सांभाळत राजकारणाची चर्चा करत होते त्यांची जागा आता त्यांच्या मुला-बाळांनी घेतलीय. फरक काय झाला असेल तर एवढाच ! प्रगती–विकास ह्या चिजा जणू यांच्यासाठी नाहीतच. असं का व्हावं ? 'सरकार कुछ नहीं करती' एवढंच उत्तर असू शकेल ?...

**४ नोव्हेंबर**

गणेश पाठक. इथं मिळालेला नवा मित्र. ॲग्रिकल्चरल बी. एस्. सी. झाल्यानंतर हा पठ्ठ्या नागपूर सोडून इथं येऊन बसलाय. काही तरी करून दाखवायला.. आल्या आल्या त्यानं सांगितलं होतं. 'तू फीर. तुला काय बघायचं ते बघ; पण मी तुला सांगतो–ह्या लोकांच्या आजच्या अवस्थेला हेच जबाबदार आहेत... ' त्या वेळेस थोडंसं न पटणारं वाटलं होतं; पण अगदी खरं वाटतंय आता. इथं आल्यापासून बघतोय. किती आळशी आहेत ही माणसं ! जागा मिळेल तिथं ठिय्या ठोकून चकाट्या पिटण्याखेरीज हे काही करतच नाहीत. काम करेल त्याला इथं कसलाही तोटा पडायचा नाही. हवी तेवढी जमीन आहे. तीसुद्धा मैलोगणती सपाट असलेली. जमीन कसण्यापूर्वी ती 'सारखी' करण्यासाठी काहीही करायला नकोय. कितीही शोधलं तरी दगड सापडत नाही अशी ही काळीभोर माती. तास–दीड तास पाऊस पडून गेला तर दोन–दोन दिवस ओल धरून ठेवणारी. आमचा कोकणातला शेतकरी बिचारा जमीन सारखी करतानाच म्हातारा होतो. कातळावर माती शोधावी लागते आणि

चार दिवस संततधार कोसळून पाऊस थांबला तर दोन–अडीच तासांत पावसाची नावनिशाणी उरत नाही. कोकणी शेतकऱ्याच्या एकसहस्रांशाने जरी इथल्या शेतकऱ्यानं श्रम केले तरी देशाला पुरून उरेल इतकं धान्य पैदा होईल. इथं पाण्याला तोटा नाही. ८।१० फूट खणल्यानंतर मुबलक पाणी लागतं. उभ्या जिल्ह्यात फक्त पाच गावांना पाण्याचा त्रास आहे. 'त्रास' म्हणजे तरी काय, तर उन्हाळ्यात दोन महिने बाहेरून पाणी आणावं लागतं. ह्या लोकांना मराठवाड्यात हाकललं पाहिजे. बारा महिने तेरा काळ मैल मैल अंतरावरून पाणी आणावं लागलं म्हणजे कळेल...

..मला वाटतं, सुबत्तेमुळे, सर्व प्रकारच्या उपलब्धतेमुळे हा ऐदीपणा हाडीमासी मुरलेला असावा; पण तेवढंच कारण दिसत नाही. ह्यांच्या वृत्तीसुद्धा सरंजामदारीच आहेत. कालच गोंड्याला गेलो होतो. तिथं चहाच्या 'मढई'त भेटलेले लोक म्हणजे नमुनेच होते. कुठल्या तरी जवळच्या गावातून आले होते म्हणे. सगळ्यांचे कपडे कल्पनेपलीकडे मळलेले. खरं तर ते शिवल्यापासून धुतलेलेच नसावेत. कारण सुती कापडावर मिलचे शिक्के असतात तसे शिक्के त्यांच्या अंगावरच्या कपड्यांवरही होते आणि कपडे जुने होऊन फाटायला लागले तरी शिक्के तसेच. तास–दीड तासाच्या गप्पांनंतर मला रहावेना म्हणून विचारलं की, 'बाबांनो, तुम्ही कधी कपडे धुता की नाही?' उत्तर मिळालं, 'क्या करें बाबूजी? गये साल–डेढ सालसे धोबी हमारे गाँवमें आताही नहीं!' मी चक्रावलोय. 'आप खुद तो धो सकते हैं?' 'बाबूजी, हम जो 'ठाकूर' ठहरे, अपने कपडे खुद कैसे धोयें?' 'ठाकूर' म्हणजे आपल्याकडचे शहाण्णव कुळी. उच्च कुळात जन्म झालाय म्हणून ह्यांना स्वतःचे कपडे स्वतः धुववत नाहीत. तसे घाण रहातात. इथला ब्राह्मण –'पंडित'–स्वतःचं भांडं विसळणार नाही. त्याला खायला मिळत नसेल कदाचित; पण कधी जर मिळालं तर स्वतःचं खरकटं स्वतः काढणार नाही. जन्माने ब्राह्मण ना! ही हालत अशिक्षित लोकांचीच नाहीये. अगदी शिकल्या-सवरलेल्या घरातूनसुद्धा हेच वातावरण सर्रास आहे. जेवल्यानंतर हात धुताना स्वतः पाणी घेणंही अनेकांना कमीपणाचं वाटतं. इथं आल्यापासून ज्यांच्या ज्यांच्या घरी जेवायला गेलो तिथं तिथं हाच प्रकार. जेवण आटोपताच घरातली मुलगी, मुलगी नसेल तर घरवाली स्वतः हातावर पाणी घालायला पुढे येत्येय. प्रत्येक ठिकाणी कटाक्षानं टाळत जातोय खरा; पण...

...उच्च वर्णात जन्म घेतला म्हणजे श्रम करणे नाही, ही इथली वृत्तीच दिसत्येय. आल्या दिवसापासून बघतोय. नानाजी नोकऱ्या देणारेत म्हणून 'पर्ची' घेऊन येणाऱ्यांची रीघ लागल्येय आणि त्यात बहुतेक जण दोन-चार गुंठे जमीन बाळगून असलेले आहेत. कालच एकजण आला होता. नवी कोरी सायकल, टेरिकॉटचे भडक कपडे आणि चकचकता गॉगल. पठ्ठ्याला रखवालदाराची नोकरीसुद्धा चालणार होती. 'शेती का करत नाहीस?' विचारलं तर 'बाबूजी, मजदूर कहाँ मिलते हैं?' हा प्रतिप्रश्न. घरात माणसं चार. म्हातारी आई, बायको आणि मुलगा. जमीन साडेचार गुंठे. ती पडिक ठेवून हा गृहस्थ नोकरी शोधायला निघालाय. असल्या लोकांपुढे नानाजी काय डोकं फोडतील?

**५ नोव्हेंबर**

मागच्या पानावरून पुढं चालू. गावाची, माणसांची नावं बदलतं जातात एवढंच! पण आज दिवसभर गणेशचं डोकं खाऊन नानाजींचा 'ग्रामोदय' प्रकरण समजावून घेण्याचा उद्योग केला. तसं समजणं जरा कठीणच जातंय. कारण हस्तकला प्रशिक्षण केंद्र सुरू करणार, १२ ते १५ वयोगटातील मुलांना प्रशिक्षण देऊन त्यांचे उद्योग सुरू करून देणार आणि त्यांच्या उत्पादनाच्या विक्रीची व्यवस्था करणार हे ठीक आहे. इकडचे लोक गवताच्या, बांबूच्या वस्तू बनवतात. फार सुंदर आणि पुन्हा रोजच्या उपयोगाच्या. मुंबईत खपाला मरण नाही. बरं, दुसरं म्हणजे शेतीसंशोधन केंद्र. तेही समजलं. भानगड कळली नाही 'प्रेरणा केंद्रा'ची! कसली प्रेरणा? ती 'देणार' म्हणजे काय? 'प्रेरणा देणारे केंद्र' म्हणजे काय असणार? ..उद्या नानाजी यायचेत, त्यांनाच विचारू, म्हणजे झालं.

**६ नोव्हेंबर**

आज सकाळी नानाजी आलेत. गेल्या सहा दिवसांत इथे माणूस यायचा तो मजुरीपुरता. आज सकाळपासून गाड्या, खादीचे कडक कपडे आणि बंद गळ्याच्या कोटांचा सुळसुळाट झालाय... जय जनता!

... मुख्य म्हणजे नानाजींनी 'प्रेरणा' ही भानगड जरा समजावून दिली. त्यांच्या सगळ्या बोलण्यावरून मी सार इतकंच काढीन की, इथल्या लोकांची प्रवृत्ती बदलणे हे मूळ काम आहे. प्रगती करणं आणि स्वतःची स्वतःच करणं यासाठी लोकांना तयार करणं म्हणजे 'प्रेरणा देणं' असा एकंदरीत प्रकार आहे.. कठीणच आहे मग. स्वतःची कामं स्वतःला करायला लावणं म्हणजे या लोकांवर केवढा अत्याचार होणारेय... ह्यासाठी नानाजींनी पन्नास तरुणांना 'ग्रामोदय संयोजक' म्हणून नेमलंय. एका ब्लॉकमध्ये दोघेजण. प्रत्येकाला सायकली दिल्यात फिरायला. ५०० रु. पगार देताहेत ... आज त्यातल्या काही जणांना भेटायला मिळालं. सध्या सगळ्यांचं लक्ष केंद्रित झालंय २५ नोव्हेंबरच्या राष्ट्रपतींच्या कार्यक्रमावर; पण तो आटोपताच पहिलं काम हाती घेणारेत ट्यूब वेल्स खणण्याचं. एका वर्षात वीस हजार विहिरी खणायच्या आहेत. गणेशच्या म्हणण्याप्रमाणे दोन हजार विहिरी सध्या खणून झाल्यात. ही मोहीम संपेल तेव्हा जिल्ह्यातील प्रत्येक शेतात विहीर असेल. शिवाय हे ग्रामोदय संयोजक प्रत्येक गावातील निराश्रित गरीब वृद्ध शोधून त्यांना उत्तर प्रदेश सरकारचं वृद्धावस्था पेन्शन मिळवून देणार आहेत. एकंदरीतच ह्या सगळ्या प्रकल्पाला लागणारा पैसा सरकारी योजनेतून उभा केला जायचाय .. बरं आहे! नानाजींचा एक विचार मात्र खरोखरीच महत्त्वाचा आणि 'बेसिक' म्हणता येईल असा आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे गेल्या ३१ वर्षांचं नियोजन 'वरून खाली' येत राहिलं. एअर कंडिशन्ड ऑफिसांमध्ये बसून तज्ज्ञांनी योजना आखल्या. ही पद्धतच चुकीची आहे. ज्यांच्यासाठी योजना आहे त्यानेच ती बनवली पाहिजे. आपली गरज आणि कुवत ओळखून आपण काय करू शकतो हे त्यानंच ठरवायला हवं. गावासाठी योजना गावानं आखावी आणि तिच्यावर आवश्यक तेवढा सफाईचा हात फिरवून सरकारने ती प्रत्यक्षात आणण्यासाठी मदतीचा हात

द्यावा. हाच प्रयोग नानाजी इथे करणार आहेत. त्यांचे ग्रामोदय संयोजक गावोगाव फिरताना लोकांमध्ये मिसळणार आहेत, त्यांच्या अडचणी-गरजा समजून घेणार आहेत आणि त्यातून मार्ग त्यांनाच काढायला लावणार आहेत. झोपलेल्याला जागं करण्याचं काम नाही हे तर जागं व्हायचंच नाकारताहेत त्यांना उठवायचं काम आहे हे ! ग्रामोदय सयोजक हे कसं करतील ? खरं तर अजून चार-आठ दिवस राहून ह्या तरुणांबरोबर फिरायला हवं ! म्हणजे ते कसं काम करतात हे, कळलं असतं. कारण अखेर हे तरुण ह्याच समाजातले आहेत ! इथल्या स्वभाव-दोषांपासून ते मुक्त असतील ? नसले तर आधी स्वतःची सोडवणूक करून घेऊन मग इतरांकडे बघण्याचं काम त्यांना करायचंय. हे स्वतःची सोडवणूक कशी करतील ? त्यांच्याबरोबर वावरल्याशिवाय ह्या आणि इतर प्रश्नांची उत्तरं मिळायची नाहीत; पण आता तर मुक्काम हलवायची वेळ झाल्येच. उद्या इथून निघायला हवं...

... अरे हो ! आज आणखी एक नमुना पहायला मिळाला. इथल्याच नाक्यावरच्या चहाच्या मढईत बसलो होतो. गेल्या पाच-सहा दिवसांमध्ये इथे नियमितपणे बसणारे दोस्त बनलेत. ' नानाजीकी स्कीम तो ठीक है । लेकीन नानाजी सरकारका पैसाही तो बाँटनेवाले हैं । वो भी कर्जेके रूपमें : क्या फायदा ? वो आज नही तो कल लौटानेही पडेंगे ' वगैरे नेहमीचं झालं. नंतर एकानं आणखी एक वळसा दिला. ' बाबूजी ! नानाजीने तो बडी मुसीबत कर दी है । यहाँ फारमपर मजदूर लगवाये, पुरे जिलेसे लोग दौडे हैं । हम लोगोंको खेतीका काम करनेके लिये मजदूर नहीं मिल रहे भय्या ! हमेही जाना पडता है । ...' जानकीनगरच्या फार्मवरच राष्ट्रपतींचा कार्यक्रम व्हायचाय. त्याच्याच पूर्वतयारीसाठी शेकडो मजूर लागलेत ...मंडप बांधायला, हेलीपॅड तयार करायला ... आणि त्यामुळे ह्या बादशहांना शेतीच्या कामासाठी मजूर मिळत नाहीयेत. स्वतःला शेतात जावं लागतंय... दुर्दैवी बिचारे !

**–माधव भांडारी, मुंबई**

---

# ग्रामस्वराज्य समिती ( शहादे )

**सहामाही अहवाल (जून ते नोव्हेंबर ७८)**

सातपुड्याच्या पायथ्याशी राहणाऱ्या आदिवासींमध्ये व इतर कष्टकरी गरीब जनतेमध्ये कामकरणाऱ्या ' ग्रामस्वराज्य समिती 'ने गेली आठ वर्षे आपले काम अव्याहतपणे चालू ठेवले आहे. याच भागातल्या आदिवासी भिल्ल समाजामधून आलेल्या कै. अंबरसिंग या तरुणाने ग्रामस्वराज्य समितीच्या कामाची उभारणी केली. अंबरसिंगांनी सर्वोदयाच्या चळवळीतून सामाजिक परिवर्तनविषयक दृष्टी प्राप्त केली आणि नंतर आपल्या स्वतंत्र प्रतिभेने लोकांची चळवळ उभी केली.

या भागातल्या गरिबांचे शोषण, त्यांची पिळवणूक अनेक प्रकारांनी होत होती. त्यांच्या जमिनी बेकायदेशीरपणे जमिनदारांनी हडप केल्या होत्या. त्यांना मजुरी फारच कमी म्हणजे बारा आणे मिळत होती. सरकारी अधिकारी व पोलिस त्यांना हवे तसे छळत व लुबडत होते. पीक संरक्षण सोसायटयांचा जुलूम चालला होता. जंगल-अधिकारी छळत होते. आता गरीब समाज संघटित झाल्यामुळे या सर्वच प्रकारांना आळा बसला आहे. अंबरसिंगांच्या मागे त्यांच्या पत्नी छायाताई व अन्य सहकाऱ्यांनी चळवळ पुढे चालवली आहे. शोषणमुक्त समताधिष्ठित समाज निर्माण करण्याची वाटचाल सुरू आहे. संपूर्ण क्रांतीचे ध्येय पुढे ठेवून चळवळ वाटचाल करीत आहे.

या भागातील परिस्थिती आता अशी आहे की, मालदार, वनविभागाचे कर्मचारी, पोलिस व अन्य सरकारी यंत्रणा यांच्याशी नित्य संघर्षाचा प्रसंग यावा; किमान वेतन कायद्यानुसार मजुरी मिळावी म्हणून सतत झगडा करावा लागतो. जंगलावर पोट भरण्याची पाळी असलेल्या आदिवासींना वनविभागाकडून नेहमीच जाच होतो. त्याला तोंड द्यावे लागते. खोटेनाटे करून आदिवासींना पोलिस छळत–लुबाडत असतात. त्याला प्रतिबंध करावा लागतो. गेल्या काही वर्षांच्या कामामुळे काही गावात रचनात्मक कार्य करण्याइतकी स्थिर परिस्थिती निर्माण झाली आहे. आदिवासी व इतर कष्टकरी समाजाची शक्ती वाढवावयाची असेल तर त्यांच्यामध्ये शिक्षणाचे, आरोग्यसंवर्धनाचे, शेतीसुधारणेचे, व्यसनमुक्तीचे कार्य पुष्कळ व्हावयास हवे आहे. ग्रामस्वराज्य समितीने शहादे, तळोदे तालुक्यात प्रौढ शिक्षणवर्ग सुरू केले आहेत. इतर कामे हाती घेतली जात आहेत. चळवळीतून तयार झालेले कार्यकर्तेच चळवळ पुढे नेत आहेत.

काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे वैचारिक, सामाजिक शिक्षण होण्याची नेहमीच आवश्यकता भासते. बहुतेक कार्यकर्ते शेतमजुरांत काम करणारे आहेत. बहुतेक स्वत: शेतमजूर आहेत–जे आपली मजुरी करून आपल्या व आसपासच्या गावात काम करतात. जूनमध्ये या सर्वांचे एक शिबीर दोंडाईचा येथे झाले. एक आठवड्याच्या या शिबिरात ४० तरुण सामील झाले होते. श्री. वसंतराव पळशीकर यांनी हे शिबीर चालविले. काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे प्रश्न व समस्या विचारात घेऊन आपण जे काम करीत आहोत ते योग्य दिशेने चालले आहे ना, याची विस्ताराने चिकित्सा या शिबिरात झाली. शिबिरात शेतमजुरी, किमान वेतन कायदा, ग्रामद्योग, आदिवासी उपयोजना यांची माहिती देण्यात आली.

गरिबांना आता असा विश्वास निर्माण झाला आहे की, आपला कोणी तरी वाली आहे. आपण आपल्यावर झालेल्या अन्यायाची दाद

मागितली तर आपल्याला न्याय मिळू शकतो. केंद्रातून अशा बाराशे तक्रारी आल्या. सरकारी अधिकाऱ्यांचा भ्रष्टाचार, रोजगार हमी कायद्याप्रमाणे मजुरी मिळत नाही, मापे व्यवस्थित घेत नाहीत, खोटी हजेरी लावतात, कामाचे कूपन दिले पण धान्य मिळत नाही, पोलिसांची मारहाण, खोट्या केसिस भरतात, जंगल-अधिकाऱ्यांचा त्रास, शेतमजुरी कमी मिळते, आपापसातील भांडणे, मला जमीन पाहिजे, दूध सोसायटीत सभासद झालो परंतु गाय मिळालेली नाही, दोन वर्षे झाली आमच्या शाळेत मास्तर येत नाही, आम्हाला रोजगार हमीचे काम पाहिजे, बैल पाहिजेत अशा प्रकारच्या अनेक तक्रारी त्यात आहेत.

कोर्टातील व कचेऱ्यांतील कामे प्रामुख्याने छायाताई पहातात. पोलीस लोकांना पकडून आणतात व जामिनासाठी पैसे मागतात. कोर्टात तारीख मिळविण्यासाठी पैसे मागितले जातात; परंतु या कामात पैशाची जरुरी नाही. पैसे न देताही अशी कामे होऊ शकतात, हे छायाताईंनी लोकांना दाखवून दिले आहे. आता लोकांनाही त्याचे वळण लागले आहे.

## सिंदीचे गावकरी

तोरणमाळ भागात या वेळी नवीनच काम सुरू झाले. तो भाग सातपुड्याच्या डोंगरात आहे. या भागात २५ गावे आहेत. बाहेरील जगाशी त्यांचा संबंधही येत नाही. वाघ, अस्वले यांचेशीच त्यांचा संबंध. वाघाला ते घाबरत नाहीत; पण अस्वलाला घाबरतात. त्यांचे सारे जीवन जंगलाशी संबंधित आहे. त्यांना जंगलचा कायदा माहीत नाही. जंगल-अधिकारी याचा खूप फायदा घेतात. लोकांना दंड करणे, मारहाण करणे, बायकांवर अत्याचार करणे, हे येथे सर्रास चालू आहे. गावात शाळा आहेत; पण मास्तर शाळेत येत नाहीत.

त्या भागात गावोगाव हिंडून लोकांच्या सभा घेण्यात आल्या. लोकांनी आपल्या अनेक तक्रारी सांगितल्या. मग एक मोठी सभा तोरणमाळ येथे झाली. त्या सभेत जंगलचा कायदा, नियम समजावण्यात आले व यापुढे कोणीही जंगल-अधिकाऱ्यांना पैसे द्यायचे नाहीत, जंगल-अधिकारी वेठबिगारी करून घेतात ती बंद करायची, रोजगार हमीची कामे काढायची व गावागावात ग्रामस्वराज्य समित्या स्थापन करावयाच्या, असे ठरविण्यात आले. या परिषदेला श्री. दिवाकर आगाशे व गोविंदराव शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. परिषदेची तयारी वेडू, सोमा व दादाभाईंनी केली होती. लोकांना संघटित करण्याचे काम वीरसिंग पाडावी, प्रभाकर बिरारी व भटू पाटील यांनी केले.

या भागात जंगल-अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराच्या अनेक तक्रारी ऐकायला मिळाल्या. त्यात सिंदी या गावची भयंकर भ्रष्टाचाराची तक्रार घेऊन लोक आले होते. त्या गावच्या २४ भूमिहीनांना जमिनी देतो असे सांगून जंगल-अधिकाऱ्यांनी प्रत्येकाकडून ५०० रुपये घेतले होते. त्यांना जमीन मिळाली नव्हती आणि पैसेही परत दिले नव्हते! अनेक वेळा लोकांनी मागणी केली; पण त्याचा उपयोग झाला नाही. एक दिवस गावचे लोक पायी चालत ३० मैल धडगावला गेले व रेंजरच्या कचेरीला त्यांनी घेराव घातला. तेथील अधिकाऱ्यांकडून पैसे परत केव्हा करू हेही लिहून घेतले. अधिकाऱ्यांनी त्यांचे पैसे हप्त्याने परत केले. वाघापेक्षा भयंकर वाटणाऱ्या जंगल अधिकाऱ्यांना आपल्या एकीच्या बळावर आपण नमवू शकतो हे या लोकांना कळले. आता जंगल-अधिकाऱ्यांच्या त्रासाला बराच आळा बसला आहे. या भागात वीरसिंग पाडवी, भटू पाटील, प्रभाकर बिरारी व गणपत भिल हिंडून गेले.

जमीनवाटपात नेहमीच भ्रष्टाचार होतो. चिरडे हे सातपुड्याच्या पायथ्याचे गाव. त्या गावची सरकारी जमीन गावचे तिघे कसत होते; परंतु शेजारच्या तलावडी गावच्या एका जमीनदाराने ती जमीन बळकावली व तो ती कसू लागला. सरकारी अधिकारीही त्याला अनुकूल होते. लोकांना काय करावे हे समजेना. सरकारी अधिकाऱ्यांकडे अर्ज वगैरे करून झाले. काही उपयोग झाला नाही. शेवटी गावकऱ्यांनी एकत्रित येऊन विचार केला व जमीन कब्जात घ्यायचे ठरविले व शेतात नांगर घातला. जमीनदाराचे लोक आले. दोघांमध्ये छायाताई व दामोदरदास उभे राहिले. जमीनदारांकडून दगडफेक झाली, तिरकामठे चालविले गेले. एक तीर छायाताईंना लागणार होता; पण त्या सावध होत्या म्हणून बचावल्या. जमीन गावकऱ्यांनी लागवडीला आणली. आता सरकार तिचे फेरवाटप करणार आहे. तक्रार करूनही या आक्रमणाची दखल पोलिसांनी घेतली नाही.

शेतमजुरांचे किमान वेतन ठरलेले आहे. त्यासाठी कायदा केलेला आहे. गेल्या २ ऑक्टोबरला मुख्यमंत्र्यांनी शेतमजुरांचे, सालदारांचे महिनामजुरीचे वाढलेले वेतन जाहीर केले आहे; परंतु काही गावांत पूर्वीचेच किमान वेतन मिळत नाही, अशा तक्रारी आल्या. प्रत्यक्ष त्या गावात जाऊन परिस्थिती पाहिली गेली. शेतमजुरांच्या सभा झाल्या. शेतकऱ्यांच्या भेटी घेण्यात आल्या. शेतमजूर बायकांना २ रुपयेच मजुरी मिळते हे दिसून आले. काही सालदारांना बाराशे रुपयांपेक्षा कमी साल मिळत हेही समजले. ग्रामपंचायत व गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. काही हालचाल झाली नाही; म्हणून संप करावे लागले. या संपानंतर मजुरीतला फरक मिळाला. हा फरक देऊर, वोराळे, कुकावल, कोठली या गावांत मिळाला. मजुरीचे फरकाचे धान्य व पैशाच्या स्वरूपात दहा ते बारा हजार रुपये शेतमजूर व सालदारांना मिळाले. छायाताई, प्रभाकर, भटू, रतिलाल यांनी हा कार्यक्रम संघटित केला. या कार्यक्रमाचे निमित्ताने नवीन वातावरण तयार झाले. अधिकार पाटील व अन्य तरुण कार्यकर्ते कामाला मिळाले.

सुलवाडे ते पिंपरी रस्त्याचे काम रोजगार हमीखाली चालू होते. शेत-मालकांनी आपल्या शेतात सर्वांनी कामाला यावे म्हणून रस्त्याचे काम बंद करायला लावले. ग्रामस्वराज्य समितीकडे तक्रार आली. लोक कामाला यायला तयार असल्यामुळे रस्त्याचे काम सुरू झाले. १६० मजूर कामाला लागले. दुसऱ्या दिवशी शेतमालकांनी इंजिनने सर्व रस्त्यावर पाणीच पाणी करून ठेवले व मजुरांना काम करणे अशक्य झाले. मजुरांनी मोर्चा काढला. ज्या जमीनदाराने पाणी लावले होते त्यांना घेराव घातला व त्या दिवसाची मजुरी रुपये ४८० वसूल केले. कलमाडी–काकर्दे रस्त्यावर ७०० मजूर काम करतात. त्यांचा पगार वेळेवर झाला नव्हता. ते शहाद्याला आले. तहसीलकचेरीत बसले. पगार झाला तेव्हाच घरी गेले! कोंढावळ

येथील १५ बायकांनी फॉरेस्ट ऑफिसरच्या कचेरीत जाऊन आपली एका वर्षापूर्वीची राहिलेली मजुरी मिळवली.

कुणाच्या मजुरीचा प्रश्न, कुणाच्या रोजगारीचा प्रश्न, जमिनीचा प्रश्न, असे अनेक प्रश्न हाताळावे लागतात. ते स्थानिक कार्यकर्त्यांनी आपापल्या भागात सोडवले. तळोदे भागात नवीन काम सुरू झाले व तेथील कामाची जबाबदारी श्री. गिरिधर पाडवींनी सांभाळली आहे. आदिवासींची जमीन गैरआदिवासींकडे गेली असेल तर ती परत मिळण्यासाठी कायदा आहे. त्या बाबतच्या केसिस ट्रिब्युनल व हायकोर्टात पडून आहेत. त्यासाठी कायदेशीर सल्ला घेण्याचे काम सुरू आहे. मुंबई हायकोर्टातील केसिस बॅ. पुंगलियांनी लढवायचे ठरविले आहे. त्यांचेकडे चार केसिस देण्यात आल्या आहेत. तळोदा तहसीलकचेरीवर जंगलजमिनीचे प्रश्नासाठी एक मोर्चाही नेण्यात आला. या भागात दहा प्रौढ शिक्षणवर्गही सुरू झाले आहेत.

## प्रौढशिक्षणाची सुरुवात

आपण निरक्षर असल्यामुळे आपल्या जमिनी आपले अंगठे घेऊन बळकावल्या गेल्या व आपली फसवणूक झाली; आपण शेतमजुरीचे हिशेब समजू शकत नाही; आता आपल्याला शिकलं पाहिजे, असं सर्वांना वाटते. हे जाणून पन्नास प्रौढवर्ग सुरू करण्यात आले आहेत. सोसायटी फॉर डेव्हलपिंग ग्रामदान या संस्थेने या वर्गाची मंजुरी मिळवून दिली आहे. मोठ्या उत्साहाने वर्ग सुरू झाले आहेत. तीस लोक वर्गात यायला पाहिजेत; परंतु अधिक लोक येतात. ४०।५० लोक हजर असतात. या प्रौढशिक्षण योजनेची सुरुवात करण्यासाठी शिक्षणमंत्री ना. सदानंद वर्दे ऑक्टोबरच्या ६ तारखेला आले होते. प्रौढशिक्षण वर्ग चालविणाऱ्या तरुणांचे एक प्रशिक्षण शिबीरही झाले. छोट्या मुलांसाठी कथामाला–कार्यक्रम ठिकठिकाणी चालू आहेत. प्रौढशिक्षण वर्गसंघटकांचे एक शिबीर नोव्हेंबरअखेरला चार दिवसांचे झाले. श्री. वसंतराव पळशीकर यांनी हे शिबीर चालवले. ग्रामदान डेव्हलपमेंट सोसायटीचे सेक्रेटरी श्री. प्रेमभाई या शिबिरासाठी मुद्दाम आले होते. त्यांनी प्रौढशिक्षण योजनेमागची भूमिका व उत्तर प्रदेशामध्ये त्यांच्या भागात चाललेल्या कामाची माहिती दिली. प्रश्नोत्तररूपी चर्चाही झाली. शिबिरात प्रा. शरद कुलकर्णी, प्रा. फडके, गोविंदराव शिंदे, श्री. उपासनी, चौधरीगुरुजी आदींनी मार्गदर्शन केले.

श्रमिक महिलांची जागृती चांगली आहे. आपल्या जमिनी मिळाल्या, मजुरी वाढली, आता आमच्या घरची, गावची दारूही बंद झाली पाहिजे असे याच महिलांनी आंदोलन चालविले. जवळ जवळ शंभर गावची बहुतांश दारू त्यांनी बंद केली. सभा, मोर्चे, मिरवणुका, महामोर्चा या कार्यक्रमांना महिला आघाडीवर असतात. अशा निवडक शंभर महिलांचे एक शिबीर नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात पिंपळोद या गावी दोन दिवस झाले. मुंबईहून प्रा. नलिनीताई पंडित शिबिरासाठी आल्या होत्या. जळगावच्या प्रा. लताताई पाटणकर, पळशीकर, प्रा. फडके यांनी शिबिराला मार्गदर्शन केले. शिबिराला आलेल्या महिलांनी आपापल्या गावचे प्रश्न व समस्या मांडल्या. त्यावर चर्चा झाली. शिबिराची व्यवस्था पिंपळोद गावचे श्री. गुलाबसिंग पवार, भटू पाटील व त्यांचे सहकाऱ्यांनी केली होती.

कार्यकर्त्यांना प्रशिक्षणासाठी, अनुभवासाठी अन्य क्षेत्रातही पाठविले जाते. श्री. वाघ व नानूभाऊ हे ठाणे जिल्ह्यातील शिबिराला जाऊन आले व त्या क्षेत्रातील कामही त्यांनी पाहिले. श्री. बोरसे वेळगावच्या शिबिराला व खंडारे नागपूरच्या शिबिरात जाऊन आले. सर्व सेवासंघाने सबंध देशातील महिलांचे शिबिर वाराणसीला घेतले. त्या शिबिराला छायाताई गेल्या होत्या. श्री. गोविंदराव शिंदे व खंडारे गोविंदपूर येथे झालेल्या शिबिराला जाऊन आले.

संघर्षात्मक कामात कित्येक वेळा संघर्ष तीव्र होतो. देऊर गावात शेतमजुरांना कमी मजुरी मिळत होती मागणी करून काही उपयोग झाला नाही म्हणून आदिवासी, हरिजन आदी स्त्री-पुरुष शेतमजुरांनी संप, सत्याग्रह सुरू केला. देऊर गावचे सरपंच इंद्रसिंग गिरासे संपावरील शेतमजुरांना कोणी काम दिल्यास रु. ५१/– दंड करण्यात येईल अशी दवंडी दिली. आठ सालदारांना हाकलून दिले व किमान वेतनाचा फरक देण्यास नकार दिला. हरिजनांचे पाणी बंद केले. हरिजन महिलांना शिवीगाळ केली. या सर्व प्रकारांविरुद्ध चाललेला संप मोडून काढण्याचा प्रयत्न पोलिसयंत्रणा करत होती. त्या भागाचे डी. वाय. एस. पी. श्री. वढिया रात्री एक वाजता गावात जीप घेऊन पोचले. संपकरी शांतपणे भजन करीत बसले होते. हे गृहस्थ एकदम सर्वांसमोर जाऊन छायाताईंना दम देऊ लागले. 'मुकाट्याने संप मागे घ्या. स्वतः शेतकरी होऊन पहा. शेतकऱ्यांना तीन रुपये वेतन परवडत नाही. तुम्ही कायदा हातात घेता असा रिपोर्ट करू, केसिस भरू. आणि तुरुंगात डांबू!' या बेताल बडबडीमुळे संपकरी चिडले. छायाताईंना वाटले, एवढा मोठा अधिकारी जर असं बोलतो तर या गरिबांना न्याय कोण देणार? आपणच आत्मक्लेशाचा मार्ग त्यांनी सुरू करायचा निर्णय घेतला व शहादा तहसीलकचेरीसमोर उपोषण सुरू केले. त्यांचे सोबत अनेक महिला उपोषणाला रोज बसत होत्या. तीन दिवसांनी असिस्टंट कलेक्टर आले व त्यांनी लोकांच्या पुढील मागण्या मान्य केल्या:–

(१) डी.वाय्.एस.पी. श्री. वढिया यांची चौकशी करू, सरपंचांवर केस दाखल होईल. (२) दलितांवरचा बहिष्कार उठेल. (३) मजुरीतील फरक मिळेल. (४) रोजगार हमीची कामे मिळतील. (५) गरिबांना नाहक छळणाऱ्या फौजदाराची बदली करण्यात येईल.

एवढं झाल्यावर छायाताईंनी उपोषण सोडले.

संघर्षाबरोबर रचनेचेही काम सुरू करायचे प्रयत्न होत आहेत. प्रौढवर्गाबरोबर आरोग्याची व्यवस्था, बालवाड्या सुरू होत आहेत. यात 'युवक प्रगती सहयोग' सहकार्य देत आहे. तरुण मंडळे व सेवादलाचे कामही सुरू झाले आहे. काही गावांतून छोट्या शेतकऱ्यांना उत्पादनवाढीसाठी साधने मिळवून देण्याच्या दृष्टीने प्रयत्न होत आहेत. त्या दृष्टीने शेतीतज्ज्ञ श्री. बलभीम मुरुगकर पाहाणी करून गेले. ग्रामदान डेव्हलपमेंट सोसायटीचे श्री. प्रेमभाई यांनीही अनेक गावाना भेटी दिल्या. त्यांनी आपल्या भागात आदिवासींनी आपली संघटना करून ही जी कामे केली आहेत त्याची माहिती दिली. पन्नास गावांचा सर्व्हे करण्याचे काम रीजनल प्लॅनिंग इन्स्टिट्यूटने सुरू केले आहे. पुढे गावांचा प्लनही ती संस्था बनवून देईल. पू. अण्णासाहेब सहस्रबुद्धे या कामी लक्ष घालत आहेत. □

पुस्तके

# मेघ, मोर आणि मैथिली

डॉ. द. भि. कुलकर्णी यांचं नवं पुस्तक 'मेघ, मोर आणि मैथिली' नुकतंच वाचनात आलं. द. भि. चे समीक्षाप्रांतातील लिखाण वाचल्यानंतर जेव्हा 'मेघ, मोर...' वाचनात येतं तेव्हा पूर्णतः निराशा पदरी येते, हे सुरुवातीलाच सांगितलेलं बरं.

स्फूट किंवा लघुत्तम निबंध असं काहीसं या लेखाचं स्वरूप. वृत्तपत्रांतील द. भि. च्या स्तंभांचं हे संकलन. वृत्तपत्रीय लिखाण हे क्षणभंगुर वगैरे असतं; पण 'लिटरेचर इज न्यूज दॅट स्टेज न्यूज' असं एझरा पाउंडनं म्हटलं आहे. दभिंनी मात्र वृत्तपत्राच्या म्हणून ज्या काही मर्यादा असतात त्या स्वीकारल्या. त्यामुळे त्यांच्या लिखाणाला काही ठिकाणी अपूर्णतेचं गालबोट लागलंय.

'मेघ, मोर आणि मैथिली' या निबंधापासून ते 'शीळ कोणी घालू नका' येथपर्यंत अठ्ठावीस स्फुटं पुस्तकात आहेत. लिखाणात अनेक विषय येऊन जातात. कुठं रात्रीचं वर्णन तर कुठं मृत्यूचं दर्शन, व. ह. पिटकेंचं शब्दचित्र किंवा लतावाईंचा आवाज असे विविध विषय येतात.

या पुस्तकाला श्रीकेक्षींची प्रस्तावना लाभली आहे. त्यात ते या स्फुटांना 'स्वैर लघुनिबंध' असं नाव देतात. हा संग्रह बौद्धिक आनंद देणारा आहे असं म्हणतात. श्रीकेक्षींना काय वाटायचे ते वाटो; पण आम्हा पामर वाचकांना मात्र बौद्धिक वगैरे आनंद काही मिळाला नाही.

या निबंधांचं वैशिष्टय म्हणजे ते आकाराने फार लहान आहेत. कुठलाही अनुभव शब्दबद्ध होताना तो अपूर्ण राहिला तर त्याचा हेतू नष्ट होण्याची शक्यता असते. 'मेघ'...मधील काही लेख असेच आहेत. ते ना बौद्धिक आनंद देतात ना काही इतर अनुभव देतात!

कुठलाही अनुभव शब्दबद्ध करताना काही ठिकाणी दभिंनी इतर तत्सम अनुभवांचा उपयोग केलेला दिसतो. पुराणकथा, रामायण आदींचा उपयोग ते यासाठी करताना दिसून येते. साहजिकच अनुभव 'पॅंची' वाटू लागतो आणि एकूण प्रकारावरूनच लक्ष उडून जातं.

पहिलाच निबंध 'मेघ, मोर आणि मैथिली.' निसर्गवर्णन, ऋतुचक्र वगैरे सांगता सांगता (जाता जाताही) सत्त्वपरीक्षेच्या संदर्भात द्रौपदीची कथाही ते सांगतात. 'आंधळ्याचे डोळे' सारख्या निबंधात इडिपस, पंचतंत्र, भावबंधन, ऊरुभंग, गांधारी आदी सर्वांचे अनुभव एकत्र मांडून दभि काही तरी सांगू इच्छितात. (नेमके?)

काही निबंध मात्र जे भावलं ते लिहिलं या पद्धतीचे आहेत आणि वाचनीयही आहेत. 'उत्तर रात्र', 'मृत्यो', 'नवे गाव', 'पिटके याला काय म्हणावं?' 'चाफा खंत करीना' अशा काही मोजक्या निबंधांची नावे या संदर्भात सांगता येतील.

एक नवा साहित्यप्रकार हाताळणे या भूमिकेतून जर हे लिखाण झालं असेल तर मग लेखकाला पुष्कळच वाव आहे.

पण एक गोष्ट सांगितल्यावाचून राहवत नाही आणि ती म्हणजे, दभिंचे जे लिखाण वाचलंय त्यामानाने हे त्यांचं लिखाण (अपवाद वगळून) वाचायला मनाची फार मोठी तयारी करावी लागते.

श्रीकेक्षींनी प्रस्तावनेत सांगितलेला द. भि. कुलकर्णींचा खेळकरपणा मात्र पुस्तकात फार क्वचित दिसला. त्यांनी म्हटलंय की, द. भि. हे अखेर टीकाकार आणि संशोधक आहेत की ललितलेखक, असा प्रश्न उद्‌भवेल! (छे! छे! कोण मान्य करील हो की मी आधी लेखक मग समीक्षक!)

शेवटी काही अपवाद वगळले तर 'समीक्षक' द. भि. कुलकर्णी हे ललितलेखक द. भि. चे मनोहारी दर्शन घडवू शकले नाहीत की काय असं वाटत रहातं!

**—मुकुंद संगोराम**

**मेघ, मोर आणि मैथिली**
डॉ. द. भि. कुलकर्णी
विजय प्रकाशन, नागपूर
पृष्ठे : १२७, मूल्य : १२ रुपये.

# उद्यम : नाबाद साठ !!

सन १९१९ च्या सुमारास 'उद्यम' या मासिकाचा जन्म झाला. लोकमान्य टिळकांपासून स्फूर्ती घेऊन महादेव कृष्ण पाध्ये या नागपुरातील एका वकिलाने प्रथम 'देशसेवक' नावाचं साप्ताहिक काढलं. १९०६ साली सरकारी रोषामुळं 'देशसेवक' बंद पडलं. त्याच सुमारास नागपुरात 'हितवाद' चा उदय झाला. ह्या वृत्तपत्राचे संस्थापक व संचालकही माधवरावच होते. १९११ साली ते तिथूनही निवृत्त झाले आणि त्यांनी जीवितकार्याला 'उद्यम' च्या रूपाने निश्चित दिशा दिली. हे कार्य पुरेसे झाले आहे, असे वाटल्यावर ते त्यातूनही तितक्याच तटस्थपणे निवृत्तही झाले. पण 'उद्यम'चं कार्य मात्र अजूनही तशाच जोमाने चालू आहे.

'जगातील तीनचतुर्थांशाहून अधिक भागात आज समाजवादी विचारांचा अंगीकार करण्यात आला आहे. एका परीने हा रोख स्वागतार्ह आहे. समाजवादाचा स्वीकार जनसामान्यांनी स्वेच्छेने केलेला आहे. समाजवादाबद्दल जनसामान्यांना वाटणारं आकर्षण स्वाभाविक आहे. समाजवाद तत्त्वतः भांडवल व श्रम या दोन्ही घटकात समता निर्माण करण्यासाठी उत्पन्न झाला आहे. भांडवल व श्रम या दोघांचीही प्रतिष्ठा समान असावी, उत्पादनातही दोघांचीही जबाबदारी समान असावी व प्राप्तीचा वाटाही दोघांचा समसमान असावा, हे तर्कसंगत आहे; पण भारतामध्ये समाजवादाचा अवलंब करताना ही बाजू लंगडी पडते. याबाबतीत शासनाची भूमिका दोन मांजरांच्या भांडणात लोणी फस्त करणाऱ्या माकडाची असते. तेव्हा प्रत्येक माणूस एक विशिष्ट स्वरूपाची, स्वयंप्रकृतीची प्रतिभा घेऊनच जन्माला येत असतो, हेच गृहीततत्त्व आपण मान्य करायला हवे आणि त्या प्रतिभेला अनुकूल असणारी व भरपूर वाव देणारी समाजव्यवस्था निर्माण करायला हवे असे 'उद्यम'चे जीवितविषयक तत्त्वज्ञान आहे.

प्रथम 'उद्यम'चा भर शेती-बागायती

व लहान उद्योगधंदे निर्माण करण्याच्या प्रवृत्ती जोपासण्यावर होता. पुढे हे क्षेत्र विस्तारण्यात आले. साधारणतः सामान्य शिक्षित लोक व ग्रामीण क्षेत्रातले लोक 'उद्यम' कडे मोठ्या संख्येने आकृष्ट झाले. नंतर 'उद्यम'ने आपल्या विषयांची कक्षा अधिक विस्तारली व ग्रामीण आणि शहरी लोकांच्या जीवनातील दैनंदिन व्यवहारांशी संबंधित असलेले अनेक विषय हाताळले. 'उद्यम'ने कोणतीही राजकीय किंवा तात्त्विक चर्चा मात्र कटाक्षाने टाळली आहे.

भविष्यकाळातील वाटचालीत ही पूर्वीची सर्व उपयुक्त सदरं त्याच साधेपणाने चालू ठेवण्याचा 'उद्यम'च्या संपादकांचा निश्चय आहे; पण यापुढे ग्रामीण आणि शहरी, सामान्य शिक्षित आणि उच्च शिक्षित, सर्व स्त्री-पुरुष वाचकांना रस वाटेल अशा बहुविध विषयांकडे 'उद्यम' वळणार आहे. आधुनिकतेबरोबर येणारी सारी आकर्षकताही आपल्या सजावटीत आणणार आहे. कारण सारा जीवनानंद उद्यमशीलतेबरोबर होत असतो, एवढंच एक साधं सत्य सांगण्यासाठी 'उद्यम' चा जन्म आणि कार्य आहे. □

---

परराष्ट्रीय घडामोडी : पृष्ठ ९ वरून

इतरांमध्ये लक्ष घालून सल्ले, सैन्य, मदत देणे, थोडक्यात इतरांच्या स्वायत्ततेत प्रेमभरे ढवळाढवळ करणे हे त्याचे उद्योग. अल्जीरिया अडचणीत येतो आहे असे दिसताच त्याने तातडीने त्याच्या जनरल पीपल्स कॉंग्रेसचे अधिवेश उरकले आणि एक विश्वासू सेनाधिकारी अल्जीरियाला रवाना केला. मोरोक्कोने जरा जरी चिथावणी दिली तरी याद राहील असा धडा देण्यात येईल, अशी त्याची अल्जीरियाच्या वतीने धमकी आहे.

अल्जीरिया प्रथमपासूनच रशियाच्या बाजूने राहिलेला आहे. अल्जीरियाच्या निर्यातीचा प्रमुख खरीददार जरी अमेरिका आहे, तरी राजकीयदृष्ट्या दोघांच्यात फारसे प्रेम नाही. परवापर्यंत फ्रेंचांची वसाहत असल्याने फ्रान्स आणि अल्जीरियाचे जरा वेगळे, नाजूक नाते आहे. या अन्तर्गत पेचामध्येच मोरोक्कोने स्पॅनिश सहाराचा (मॉरिटॅनिया) प्रश्न तडीस लावण्याचे मनावर घेतले तर मात्र अल्जीरियावर बाका प्रसंग येईल.

परंतु लष्करी मदतीने लिबिया आणि राजकीय मध्यस्थीने फ्रान्स ती वेळ टाळतील असे दिसते. □

---

**आमच्या थडग्यांजवळून जाताना**
**आमचे आशीर्वाद घेऊन जा.**
**कारण भविष्यामध्ये हीच थडगी**
**जगातील स्वातंत्र्यवाद्यांची तीर्थस्थाने होणार आहेत !**

हाफिज् या लोकप्रिय इराणी कवीने या ओळी सहाशे वर्षांपूर्वीच लिहून ठेवल्या,
कदाचित् नजिकच्या भविष्यकाळात या ओळी खऱ्याही ठरतील;
पण त्यानंतर हीच तीर्थस्थाने
कुरुक्षेत्र तर बनणार नाहीत ?

# इराण विशेषांक

**लवकरच.**

# नव्या आशा, नवी किरणे

## ५९ वे अ. भा. नाट्यसंमेलन

सावंतवाडीच्या रम्य परिसरात ५९ वे मराठी नाट्यसंमेलन दि. २३, २४ आणि २५ डिसेंबर रोजी पार पडले. बाहेरगावचे नाट्यप्रेमी रसिक, प्रतिनिधी यांच्याबरोबरच किंबहुना काकणभर जास्तच सहभाग सावंतवाडीच्या कलासक्तांनी घेतला.

संमेलन झाल्यानंतर ते कसं झालं, यापेक्षा त्यातून काय मिळालं हे महत्त्वाचं असतं; पण सर्वसामान्यपणे संमेलन झालं की रुसवे–फुगवेच सुरू होतात. गेल्या वर्षीच्या साहित्यसंमेलनात 'बड्या' साहित्यिकांनी गोंधळ घातला की शमवला, या प्रश्नाचा शोध साहित्यसंमेलनवाले अ-साहित्यिक अजूनही घेताहेत, त्यावर ठराव पास करताहेत ही खेदाची गोष्ट आहे. म्हणूनच नाट्यसंमेलनाने काय दिलं, हे महत्त्वाचं.

या संमेलनाचे अध्यक्ष प्रा. भालबा केळकर. त्यांचं प्रसन्न व्यक्तिमत्त्व, लाघवी बोलणं आणि कमालीची रसिकता यामुळं हे संमेलन श्रवणीय त्याप्रमाणे देखणंही झालं. भालबांचं भाषणही नाटकाच्या संदर्भात खूप नवनवे विचार लेवून आलेलं. त्यांनी रंगभूमीच्या सर्व अंगांना स्वतःचा, अनुभवाच्या मुशीतून आलेल्या वैचारिकतेचा स्पर्श केला.

'माणसाला जीवनाचा प्रतीत झालेला अर्थ आणि त्या प्रतीत झालेल्या अर्थाला त्याने दिलेला आविष्काराचा आकार म्हणजे कला,' अशी व्याख्या करून भालबा म्हणाले, 'कलेचं जीवनात स्थान आणि कार्य हे हे केवळ प्रदर्शनाचं नाही. आत्मप्रतीतीच्या आविष्काराला वाव देऊन व्यक्तिमत्त्वाचा विकास घडविणं, समृद्धी साधणं, बौद्धिक आणि भावनिक आनंद मिळवताना सुसंस्कृततेची जाणीव जास्त ठळक करून समाजविकास घडवण्यास साहाय्य करणं हाही कलेचा एक भाग होतो. नाट्यकला ही एक सर्वंकष कला आहे, सहकार्ययुक्त संघकला आहे. त्याचबरोबर वैयक्तिक आविष्कारकलाही आहे. समाजस्थितीच्या प्रदर्शनाबरोबरच समाजघडणीतही तिचं स्थान आणि कार्य फार मोठं आहे.

'नाटक हे समूहानं पाहण्याची कलाकृती आहे. एक प्रेक्षक आला तरी पुरे, हे म्हणणं एक तर फसवं तरी असतं किंवा ती प्रतारणा तरी असते. त्यामुळं या कलाकृतींचा परिणाम दूरगामी आणि खोल असतो, हे जाणून आविष्कारात कलात्मकतेची उंची जास्तीत जास्त ठेवणं हे अटळ असतं. रंगभूमीवरील जगावेगळ्या आविष्कारांचं अपरिहार्यत्व पटण्याइतकी नाट्यकृती समर्थ हवी आणि तसाच आविष्कारही!

'लिखित नाटक हे पुस्तकाच्या कुंभात बंद केलेली अणुशक्ती आहे. ती अत्यंत योग्य नियंत्रण ठेवून जर वापरली तर आगळी सुखद, वैभवशाली सृष्टी निर्माण करील आणि अणुबॉम्बसारखी उधळत निघाली तर नाशाला कारण होईल, सुख-स्वप्न, कलात्मक जीवन उधळून टाकील. शेवटी जीवनाचे दर्शन म्हणजे नाटक हे ध्यानी घेतले पाहिजे.'

भालबांचे विचार असे कुठलाही आडपडदा न ठेवून सरळ बाहेर येतात, श्रोत्यांच्या बुद्धीला विचार करायला लावतात.

संमेलन शांतपणे पार पडलं. परिसंवाद, नाटकं आदी कार्यक्रमही उत्साहात पार पडले. संमेलन झाल्यावर भालबांची पुण्यात गाठ घेतली. संमेलनाबाबतचे काही प्रश्न आणि त्यांची 'रिॲक्शन' हवी होती.

'संमेलन एकूणात छान झालं. आपल्याकडील संमेलनात वेळेचा भाग कमी पाळला जातो; पण या संमेलनात मात्र त्याकडे कटाक्ष दिला गेला. सावंतवाडीकरांचं प्रेम हा या संमेलनाचा सर्वांत महत्त्वाचा भाग.

'अशी संमेलनं काही तरी देण्याकरिता असतात; पण त्यांचं स्वरूप उत्सवासारखं झालंय. ती 'गेट टुगेदर'पलीकडे जात नाहीत; पण परस्परविरोधी मतांची माणसं एकत्र येतात, विचारांची देवाण-घेवाण होते. मनाचे कंगोरे घासून झिजले जातात. हे संमेलनाचं महत्त्व नाकारता येत नाही.

'संमेलनातील परिसंवाद सुरेख झाले. मोठमोठे वक्ते होते. श्रोत्यांची तुडुंब गर्दी कार्यक्रमाच्या शेवटापर्यंत होती आणि वक्त्यांमध्येही पुनरुक्ती नाही, हे विशेष. ते सर्वजण मनापासून बोलले.'

'–पण साहित्यसंमेलनाला साहित्यिकांच्या प्रांतात जे आणि जसं महत्त्व प्राप्त झालं आहे, तसं नाट्यसंमेलनाला अजून झालेलं नाही,' –मी.

'तुमचा हा मुद्दा मला मान्य आहे; पण याबाबत मला असं वाटतं की, साहित्यिकांचे प्रश्न नाहीत–म्हणजे ते गहन नाहीत. नाट्यक्षेत्र ही सामूहिक कला असल्याने प्रत्येकाचे प्रश्न निर्माण होतात. उदाहरणार्थ, व्यावसायिकवाले म्हणतात की, मराठी नाट्यपरिषद आमच्यासाठी काय करते? पण पुढील वर्षी होणारं नाट्यसंमेलन निर्मातासंघ भरवत

आहे ही चांगली गोष्ट आहे. त्यायोगे व्यावसायिक, हौशी, प्रायोगिक यांमधील दरी नष्ट होण्यास मदतच होईल.

'तसंच या संमेलनांचं स्वरूप बरंचसं 'ॲकेडमिक' झालंय. संमेलन यशस्वी होण्यासाठी सर्व स्तरांवरील नाट्य–कलावंतांना एकत्र आणलं पाहिजे. त्यांच्यामध्ये देवघेव करवायला पाहिजे. मराठी नाट्यपरिषद त्याकडेही लक्ष देईल.

प्रायोगिक रंगभूमीचा विकास म्हणजे व्यावसायिक रंगभूमीची समृद्धी. आमची रंगभूमी ही एक प्रयोगशाळा आहे. कुठल्याही प्रॉडक्टस्‌ची तपासणी आधी प्रयोगशाळेत होते आणि मग त्याचं व्यावसायिक पातळीवर उत्पादन करण्यास सुरुवात होते. व्यावसायिक व प्रायोगिक रंगभूमीमधील हे नातं घनिष्ट करायला हवं.

'आजच्या प्रेक्षकवर्गाबद्दल तुमचं काय मत आहे ?' – मी.

'आज प्रेक्षकवर्ग तयार करणे हे महत्त्वाचं आहे. अशा जाणकारांना काही नवं देण्याची तर रंगभूमीची धडपड. त्या दृष्टीनं मराठी नाट्यपरिषदेच्या वतीने नाट्यशिबिरं भरवण्यात येणार आहेत. त्यात व्यावसायिकांचाही सहभाग असेल. त्यातून मार्गदर्शन करणं व चांगला प्रेक्षकवर्ग निर्माण करणं हे साध्य करायचंय. जे कलाकार सध्या निष्क्रिय आहेत त्यांच्यासाठी जुजबी का होईना, मदत देण्याची योजना आहे. त्यांच्याकडे जाऊन त्यांची माहिती गोळा करून शासनाकडे देण्याचं काम मराठी नाट्यपरिषद या वर्षी करणार आहे.


'या परिषदेची स्वतःची अशी एक बैठकीची जागा तयार करायचीय. इथं व्यावसायिकांनी आणि प्रायोगिकांनी दोघांनीही एकत्र यावं हा त्यामागचा उद्देश आहे. शासनाला स्पर्धांबाबत परिषद सहकार्य करणार आहे. त्याचप्रमाणे बाहेरगावाहून जी नाटकं येतात वा बाहेरगावी जी नाटकं जातात त्यांना ही परिषद मदत करेल. ज्या कलाकारांना व्यावसायिक रंगभूमीत जायचं आहे अशांची माहिती असणारं एक नियतकालिकही सुरू करण्याची योजना आहे.'

नाटक हा विषय म्हटलं की भालबा खूप जिव्हाळ्यानं बोलतात. आता पुढील वर्षभरात जे जे करायचंय त्यासाठी त्यांच्या पायात दुप्पट वेगाची चाकं बसणार. दर शनिवार–रविवार बाहेरगावी दौरा असा बेत. भालबांची जिद्द दांडगी आहे. भालबांना सर्वांची साथ हवीय. ती मिळाली तर आजची रंगभूमीची अवस्था सुधारण्याचे किरण दिसतील. या कामासाठी त्यांना मनापासून शुभेच्छा !

—प्रतिनिधी


**हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?**
**राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?**

या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी........



**नाझी भस्मासुराचा उदयास्त**

लेखक : वि. ग. कानिटकर
आवृत्ती : तिसरी (सचित्र)
किंमत : रुपये पंचेचाळीस
राजहंस प्रकाशन, पुणे

# आंतरराष्ट्रीय बालकवर्ष : पृष्ठ ७ वरून

मिळवून देण्याच्या घोषणा राज्यकर्ते सतत करत असतात. स्वातंत्र्योत्तर काळात शाळांची संख्या वाढली असेल, महाविद्यालयेही निघाली असतील; परंतु शिक्षणाचा पसारा वाढत असतानाही त्यावर मोठ्या प्रमाणावर रक्कम खर्च केली जात असताना आपल्या देशात अनेक बालकांना शिक्षण नाकारलं जातं याची कारणं आपल्या आर्थिक परिस्थितीत आहेत, आपल्या सामाजिक रूढीत आहेत, आपल्या शिक्षणपद्धतीत आहेत, शिक्षणाच्या आशयात आहेत. उतरंडीच्या वरच्या मडक्यातच आजचं शिक्षण घोटाळतंय. सर्वसामान्य मुलं शिक्षणच घेऊ शकत नाहीत. ५१ सालच्या जनगणनेमध्ये १ ली ते ४ थी शाळेत जाणारी मुलं ४२·६% होती ती ६१ साली ८५·३% झाली. म्हणजे याच वेगानं भारतात संपूर्ण साक्षरता यायला हवी होती; पण हे खरं चित्र नाही. कारण याच वयात बहुसंख्य बालकं शाळा सोडून जातात, याची कारणं शोधण्यासाठी काही प्रातिनिधिक उदाहरणं पाहू.

७ वर्षांच्या छोट्या गंगूला शाळेची मोठी आवड आहे. गंगूची आई आणि वडील दोघंही शेतमजूर आहेत. गावात सरकारी शाळा आहे. तिथे फी घेत नाहीत. तरीही गंगू शाळेत जाऊ शकत नाही. कारण शाळेत जायला अंगभर कपडा लागतो, पुस्तकं लागतात, पाटी लागते. गंगू एकटी नाही. तिची ३ भावंडं आहेत. आईवडिलांचं पोट हातावर आहे. रोजाशिवाय दुसरा कोणताही उद्योग नाही. शिकायला पैसे कुठून आणणार ? शिवाय गंगूच्या आईला वाटतं, पोरीला कशासाठी शिकवायचं ? शिकली तर जास्त शिकलेला नवरा कुठून आणायचा आणि शिकवून फायदा काय ? नवऱ्याच्याच घरी जाईल ! शिवाय दिवसभर शाळेत गेली तर भावंडांकडं कोणी बघायचं ? ६ माणसांचं करता करता आणि शेतावरचं काम बघता बघता गंगूची आई थकते. मग घरात हाताखाली कोणी तरी हवंच. गंगू सकाळी पाणी आणते, कपडे धुते. भांडी घासते. दुपारी सरपणाला, शेण गोळा करायला भावंडांना घेऊन जाते. गंगू थोडी मोठी झाली की, मग ती मालकाच्या शेळ्या सांभाळील, तिचं पोट बाहेर पडेल. अशा हजारो गंगू भारतातल्या हजारो खेड्यापाड्यांत आहेत. एक तर त्या शिक्षण घेऊ शकत नाहीत आणि २।३ इयत्ता शिकतात आणि शिक्षण अर्धवट सोडून स्वस्त दरात काम करायला लागतात.

दुसरं उदाहरण सुरेशचं ! दुष्काळ पडला आणि सुरेश आई-वडिलांसकट शहरात आला. कर्जाच्या ओझ्यानं सुरेशचा बाबा आधीच मेटाकुटीला आला होता. शहरात आल्यावर तो कागद गोळा करायला लागला. गावाकडं तो शाळेत जायचा, थोडी अक्षरओळख होती. आता दिवसभर कागदासाठी हिंडावं लागतं. वेळ कुठाय ? वेळ असला तरी पोट कसं भरायचं ? कारण कधी आईला धंदा मिळतो तर कधी नाही, बाचंही तसंच ! असे अनेक सुरेश पुरामुळं गाव उद्ध्वस्त झालं, दुष्काळ पडला, गावाकडं काम नाही अशा अनेक कारणांनी शहराकडं आलेले, वयाच्या ७ व्या ८ व्या वर्षी 'कर्ते' झालेले. यांनाही आजची आर्थिक रचनाच शिक्षण नाकारते.

हा आहे भीमा. भीमाच्या वडिलांची २।३ एकर शेती आहे. कॅनॉल आले, पाटाचं पाणी कुठं कुठं गेलं; पण भीमाच्या गावाला काही कॅनॉल नाही. पावसाच्या पाण्यावर भीमाचे वडील पीक घेतात. खरिपाची पिकं झाली की, भीमाची आई-वडील, धाकट्या भावंडांसह भीमाला घेऊन बैलगाडीत संसार घालून साखरकारखान्याकडं वळतात. तिथं उसाची लांबच लांब पसरलेली शेतं आहेत. भीमाचे आई-वडील उसाची तोडणी करतात. कारखान्यानं दिलेल्या जागेत तात्पुरती झोपडी उभारतात. चार–पाच महिने रहातात. साखरेचा हंगाम संपला की परत गावी जातात. उसाच्या शेतात भीमा कधी खोडक्या वेचायला जातो. साखरेच्या हंगामात असे हजारो भीमा जिल्ह्याच्या दुष्काळी भागातून स्थलांतर करतात. भीमाच्या बांबूच्या आणि पाचटाच्या झोपडीत भीमा ऊस खातो. समोरचा कारखाना बघतो, कारखान्याच्या शाळेत जाणारी मुले बघतो ..दर वर्षी भीमाचे आई-वडील स्थलांतर करतात. भीमाला शिक्षण मिळणारच नाही !

शामची हकीकत वेगळी आहे. शामचे वडील कारखान्यात फिटर आहेत. ते एका झोपडपट्टीत रहातात. मुलानं शिकावं आणि साहेब व्हावं असं शामच्या वडिलांना खूप वाटतं. शाळेत शाम शुद्धलेखनाच्या चुका करतो असं बाईंना वाटतं व ह्या पोरांची भाषा कधी सुधारणारच नाही, असं बाई दुसऱ्या बाईंना सांगतात. शामला बोलावतात. प्रसंगी मारतात. शामनं शाळेची भीती घेतलीय. कारण शामला दहा म्हणायला जड जातं. तो पटदिशी धा म्हणतो. यात काय चुकतं ते त्याला कळत नाही. कारण 'धा' म्हणून त्यानं वडिलांनी आणलेले दहा कांदे मोजून दिले होते आणि वडिलांची शाबासकी मिळवली होती. शाळेत एका वर्गात ६० मुलं आहेत. प्रत्येक मुलावर लक्ष रहात नाही. शाम कसा तरी ५ वी ६ वीपर्यंत जातो, त्याला भाषा शुद्ध लिहिता येत नाही. कमी मार्क मिळतात. गणित त्याला येत नाही; पण खरं तर ह्याला बाजार चांगला करता येतो, तो पैशाचे हिशोब व्यवस्थित करतो; पण तो बीजगणितात नापास होतो. शामला शाळेचा कंटाळा येतो. त्याला शाळेची-मास्तरांची भीती वाटते, राग येतो आणि एक दिवस झोपडपट्टीच्या नाक्यावर बसलेल्या मुलांत तो पत्ते खेळायला जातो. शाळेतले गणित, इतिहास असले विषय त्याला जमत नाहीत. हळूहळू शामचं शाळेतलं लक्ष उडतंय. शामचे वडील दाखला घ्यायला जातात. मुलं नापास होतात किंवा शाळा सोडून जातात याला कारण शिक्षणपद्धती किंवा शिक्षणाचा आशय आहे हे सांगण्याऐवजी बाई शामच्या वडिलांना चिक्कार बोलतात. एखादा 'क्लास' लावा म्हणतात आणि वर सांगतात तो 'अभ्यासा'च्या – शिकायच्या लायकीचा नाही. तो 'कष्टाचीच' कामं करेल ! तुमचा समाजच शिकायच्या लायकीचा नाही !' असे अनेक विद्यार्थी शाळा सोडून जातात. शामसारखी अनेक मुलं शिक्षण का पूर्ण करू शकत नाहीत ? असे अनेक शाम आदिवासी समाजात आहेत. आदिवासी मुलं नापास का होतात याचं कारण काय ? याचा शोध, याबद्दलची पाहणी आकडेवारी जनगणनेत नाही. आकड्यांच्या नजरबंदीत किती दिवस आदिवासी दलित

सर्वसामान्यांना शिक्षण नाकारले जाते ते आपण दडवून ठेवणार ? मुलं नापास होतात याला कारण ती मठ्ठ, त्यांचे आईबाप अज्ञानी हे आहे की आमचं शिक्षणच एका विशिष्ट वर्गाच्या भाषेतून, त्यांना हवं तसं बेतलं आहे हे आहे ? नापास होणारी आणि शाळा सोडून जाणारी सर्व मुलं खरोखरच मठ्ठ आहेत का ?

ज्यांना संपत्ती मानलं आहे त्यांच्या शिक्षणाबाबतचं हे किळसवाणं वास्तव इथे आमूलाग्र बदल झाल्याशिवाय बदलणार नाही हे निश्चित. बालकवर्षाच्या निमित्तानं या सर्व किळसवाण्या वास्तवाची गंभीर नोंद घेतली जाणं त्या दृष्टीनं अनौपचारिक शिक्षणाचे वर्ग सुरू करणं याचा विचार करायला हवा.

ही झाली शिक्षण नाकारलं गेल्याची कारणं; पण जी बालकं शिक्षण घेऊ शकतात त्यांना तरी आम्ही शिक्षणातून काय देतो ? शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचं महत्त्वाचं साधन मानलं गेलंय; पण गेल्या काही वर्षांतल्या शिक्षणाचा इतिहास सांगेल की, शिक्षणातून कोणत्याच पुरोगामी जाणिवा विकसित झाल्या नाहीत. याच्यासाठी एकच उदाहरण पुरेसं आहे. मराठवाड्यात नामांतर विरोधी दंगलीत ६ वर्षांच्या बालकापासून २५/३० वर्षांचे युवकही सामील होते. बाबासाहेबांना अर्वाच्य शिव्या देत दलितांचा आईमाईवरून उद्धार करीत ही मंडळी सर्व सरकारी कचेऱ्या / दलित वस्त्यांवर हल्ला चढवीत होती. या घटनेतून तरी शिक्षणाची आखणी करणाऱ्यांनी, टेक्स्टबुके लिहिणाऱ्यांनी बोध घ्यावा ! म्हणून बालकवर्षात बालकांना शिक्षण का मिळत नाही, त्याचबरोबर समतेचा विचार आम्ही किती रुजवितो याचा विचार व्हायला हवा.

याच संदर्भात बालवाङ्मयाबद्दल थोडं लिहिलं तर अप्रस्तुत होणार नाही. भुतंखेतं, मंत्रतंत्र इत्यादि गोष्टींनी युक्त रंगीबेरंगी चांदोबा मासिक भारतातल्या १४ भाषांत प्रसिद्ध होतं. ते स्वस्त दरात उपलब्ध आहे. त्याचा वाचकवर्ग मोठा आहे. लहान मुलांना तर ते अतिशय आवडतं. या सर्व कथांत वैज्ञानिक भाग नसतोच. एखादी जादूवर आधारित गोष्ट सोडली तर उरलेलं जग योगायोग, चमत्कार, देव, दानव, हडळी, चेटकिणी यांनी भरलेलं आहे. अमाप वैज्ञानिक संशोधन होऊनही हे कथाविश्व अजूनही मागासलेलंच आहे. मुलांच्या मनावरील या गोष्टींचा प्रभाव पहाता बालवाङ्मयाबद्दल गांभीर्यानं विचार व्हायला हवा. अजूनही लहान मुलांच्या अनेक पुस्तकांत, लहान मुलांच्या सदरातील कथांत ' एक होता राजा. त्याला होत्या दोन राण्या. एक आवडती आणि दुसरी नावडती ' अशा अनेक कथा आढळतात. ह्या नावडत्या राणीला नेहमीच मूल नसतं. (म्हणजे मूल नसणारी बाई नावडती, वाईट ! ) आणि आवडत्या राणीला दिवस राहिले की ही मूल नसलेली नावडती राणी येणार, आवडत्या राणीचं मूल उचलणार, तिथं कुत्रा, मांजर किंवा वरवंटा ठेवणार ! ( म्हणजे मूल नसणाऱ्या बायका इतक्या भयानक असतात, असा लहान पोरांचा समज ठरलेलाच. ) दुसरा या कथाकारांचा आवडता विषय म्हणजे सावत्र आई आणि या सावत्र आईचं वर्णन दुष्ट, कजाग असं केलेलं. स्त्रियांबाबत समतेचे विचार देण्याऐवजी अशा कथांतून स्त्रीबद्दल किती घातक विचार मांडले जातात ! स्त्रीच्या मातृत्वाचे गोडवे अप्रत्यक्षरीत्या गाइले जातात आणि मूल असणं किती चांगलं, तेच तिचं कर्तृत्व हेसुद्धा भुलाऊ भाषेत सांगितलं जातं याची नोंदही घ्यायलाच हवी. स्त्रियांबद्दलचे बालवाङ्मयातले हे विचार तर दुसरा भाग – ' इत्तेफाकी हंगामा ! ' गोष्टीतल्या राजापुढे नेहमीच काही तरी प्रश्न असतो. कधी त्याचे डोळे जातात तर कधी राजकन्या हरवते ! मग राजाला औषध आणायला जाणाऱ्या तरुणाला साधू भेटणार. तो उडणारा गालिचा, बोलका शंख, मंतरलेला कमंडलू, जादूची मंतरलेली अंगठी वगैरे वस्तू देणार ! आणि मग त्याच्या सहाय्याने राजपुत्र यशस्वी होणार ! बास झाले ना चमत्कार ! ग्रहमालेतल्या इतर ग्रहांचा शोध घेण्याइतकं मानवानं संशोधन केलंय. गालीच्यावर बसून उडणारं हे बालवाङ्मय केव्हा पृथ्वीवर उतरणार ? बुवाबाजी, अंधश्रद्धा, चमत्कार यांवर विश्वास वाढवणाऱ्या त्या बालवाङ्मयाचा आपण गांभीर्याने विचार करणार आहोत की नाही ? बालकांना साहसाची, शौर्याची आवड निर्माण व्हावी हे मान्य; पण त्यासाठी हे चमत्कारिक, योगायोगावर आधारलेलं वाङ्मय कशाला ? यावरून साहसाची आवड वाढली की, योगायोग, चमत्कार आणि बुवाबाजीला पोषक मनोभूमी तयार झाली ?

शिक्षण सोडून दिलेला विद्यार्थी, शाळेतून बाहेर फेकला गेलेला विद्यार्थी साहजिकच पैसा कमावण्याकडे वळतो. बालकामगारांचे शोषण होऊ नये म्हणून आपल्याकडे कायदे आहेत; पण गंमत अशी आहे की, जिथे बालकामगारांसाठी कायदे आहेत त्या उद्योगात बालकामगारांची फारशी भरती होत नाही. ग्रामीण भागातल्या बालकामगारांना कोणते कायदे लागू आहेत ? गुरे वळणे, कापूसवेचणी, शेंगा, अशा कामात अतिशय स्वस्त दरात ही मुलं काम करतात. हॉटेलउद्योगातही बालकामगार मोठ्या प्रमाणावर आहेत. किती तरी लघुउद्योगात, घरगुती उद्योगात बालकामगार सामावलेले आहेत. कमी पगार, कामाच्या अनियमित वेळा, कोंदट जागा, मालकाची दमबाजी चालवून घेत पोटासाठी हे बालकामगार राबतात. बालकामगारांच्यात मुलींचं प्रमाण मोठं आहे. देशात बेकारी मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. गावाकडे किंवा शहरात काम मिळत नाही म्हणून मिळेल त्या वेतनावर राबायला मुलं तयार होतात. कायद्यातून पळवाटा काढून या बालकामगारांची भरती होते. अशा हजारो बालकामगारांना कायद्याचे संरक्षण मिळण्याची मोठी गरज आहे.

बालकांचे इतरही अनेक प्रश्न आहेत, समस्या आहेत. शहरातल्या मुलांना क्रीडांगणं नाहीत, कित्येक शाळांच्या स्कूलबसेस नाहीत, शिक्षण खर्चिक आहे. त्या समस्यांचा आढावा एका लेखात घेता येणं शक्य नाही.

तर – बालकवर्षाच्या सगळ्या अपरिमित उत्साहाचं, समारंभाचं केंद्र आधी वर्णन केलेली बालकं व्हायला हवीत. खरूज झालेल्या शरीराचे, बेकारांच्या राखीव फौजेत असलेले, शिक्षण नाकारली गेलेले बालक / बालिका, धार्मिक, सामाजिक रूढीपायी देवदासी किंवा देवाला वाहिल्या गेलेल्या बालिका यांच्याभोवती बालकवर्षाच्या निमित्ताने संरक्षक भिंती उभी करायला सुरुवात व्हावी.

म्हणून बालकवर्ष हे केवळ खरूज झालेल्या, आंधळ्या, मुक्या, बहिऱ्या बालकांचं नाही.

ते वर्ष आहे गंजलेल्या ब्लेडनं नाळ कापली गेल्यानं मृत्युमुखी पडलेल्या आईचं –

भुकेसाठी पोराचा टाहो ऐकून, चार दिवस उपाशी राहिल्यानं छातीत दूध न येणाऱ्या आणि डोळ्यांतल्या पाण्यानं पोराचं जावळ भिजवणाऱ्या आईचं —

पोराला पोटभर जेवू घालण्यासाठी, शिकवण्यासाठी, कायमचा रोजगार मागणाऱ्या शेतमजुराचं – गरीब शेतकऱ्याचं –

प्रगतिनिदर्शक आकडेवारीची नजरबंदी करून फसवणाऱ्या शासनाला जाब विचारण्याचं – ! □

फ्रेंच चित्रपट । अशोक प्रभाकर डांगे

# ‘ काउण्ट क्लेराम्बर्दची कथा ’

गोष्ट आमची नाही, तशीच तुमची देखील नाही आणि तुमच्या-आमच्यासारख्याच कुणा चार-चौघांचीही नाही. म्हणून तर ती एका कातर कुतूहलात पांढऱ्या पडद्यावर पहायची. तशी न पाहिलेल्या चार-चौघांना मोडत मोडत सांगायची. शहाण्या शब्दांनी सजवायची. गोष्ट अगदी सीधी-साधी नाही आणि तेवढी सरळ-सोपीही नाही. गोष्टीच्या पूर्वार्धातच भेटतो तो एक कुलीन कडवा काउण्ट. फ्रान्समधला हा कुलीन सरदार, आपल्याकडच्या कुठल्याही चलाऊ चित्रपटांतल्या नाही, तर खपाऊ रहस्यकथेतल्या उद्दाम ठाकराला साजेसा असतो. हेक्टर डी. क्लेराम्बर्द हे त्याच चित्रपटांतले लंबचवड नाव. एका सरदार घराण्याचा हा एक वयस्क वारस. आपल्या खानदानाचा जबरदस्त अभिमान बाळगणारा गावाबाहेरच्या एकाकी गढीत अभिमानाने रहाणारा. ही गढीदेखील तुम्ही-आम्ही आगेमागे कुठे तरी पाहिल्यासारखी. तिला आरपार वेढून टाकणारी भली थोरली दगडी तटबंदी. तटाबाहेरचा जीवघेणा खंदक. खंदकावर एकच एक लाकडी पूल, भव्य भारदस्त भिंती. देखणे दिवाणखाने. कातीव कलाकुसरीचे फर्निचर, रंगीबेरंगी झुंबरं. स्टफ करून टांगलेली प्राण्यांची मुंडकी. मस्त पोसलेली गुरं-ढोरं. उमदे घोडे. शिकारी कुत्री, मांजरं. शेकडो एकरांत पसरलेली शेतं, विस्तृत कुरणं, गर्दगार रान. ह्या खानदानी वातावरणाला साजेसं असंच खूप काही—एका खानदानाची इभ्रत नेकीनं राखणार !

पण पुढे-मागे हे सारे वैभवच विस्कळीत होऊन गेलेलं. ती उमदी अवाढव्य वास्तूच मुळी शापभ्रष्ट होऊन गेलेली. दैवाचं दानच दुरापास्त होऊन गेलेलं त्यामुळं ह्या साऱ्या खानदानी साम्राज्यावरच एक अनाम अवकळा सावलीसारखी पसरलेली. वास्तवाच्या त्या झंझावातानं काऊण्टची सारीच प्रतिष्ठा पणाला लागलेली आणि अखेर उन्मळून पडलेली. त्याची सारी संपन्न शेतं, कसदार कुरणं हिरावली गेलेली. उंची भांडी, फर्निचर, घोडे, गाड्या, कुत्री, मांजरंदेखील लिलावात निघालेली आणि एवढं सारं गमावूनदेखील, कर्जाची राडदेखील पुरती न उपसली गेलेली. ह्या साऱ्या घालमेलीत काउण्टनं आपली गढी मात्र कटाक्षाने वाचवलेली. शेकडो वर्षांचं इमान सांगणाऱ्या काउण्टला कर्जाचा भार उरावर असतानादेखील ती वास्तू विकावीशी वाटत नाही. एवढंच त्या साऱ्या वावटळीतून मागे राहीलेलं रोकड सत्य.

प्राण गेला तरी बेहत्तर; पण ही पारंपारिक गढी विकणार नाही, ह्याच एका निर्धारानं झपाटून, नवीन जीवन जगायला निघालेल्या काउण्ट क्लेराम्बर्दचीच गोष्ट दिग्दर्शक यीव्ह्ज रॉबर्टनं पडद्यावर मांडलीय. नक्त नशिबाला नाकारायचं, दैवाचं दान झुगारायचं आणि मग वाट्याला येणाऱ्या दुःख, कष्ट, वेदनांना कठोर कर्तव्य म्हणून आपलंस करायचं, हाच काउण्ट क्लेराम्बर्दच्या पुढच्या आयुष्यातला गुरुमंत्र असतो आणि जसं ठरवलं तसं ते पार पाडण्यासाठी तो मनाने आणि शरीराने देखील सिद्ध असतो. वृद्ध,वाकलेली आई, थकली—भागलेली पत्नी, वयातला वेडसर मुलगा हे सारंच बिढार त्याला आपल्या ह्या कठोर वाटचालीत स्वतःबरोबर चालून न्यायचं असतं. हा सारा कुटुंबकबिला पाठीशी घेऊन काळाच्या विरुद्ध चालून जायचं होतं आणि त्यातूनच मग परिस्थितीचं पारडं पालटवून टाकणं त्या खानदानी ठाकुराला शक्य होणार होतं. आपली सारीच पारंपारिक शस्त्रं बोथट झालेल्या काउण्टला आता चार पैसे मिळवण्यासाठी जगाच्या बाजारात उतरणं भाग होतं आणि तसा तो व्यावहारिक विश्वात उतरलादेखील. काउण्ट क्लेराम्बर्दनं आपल्या उपजीविकेसाठी स्वेटरविक्रीचा व्यवसाय चालू केला. आपल्या गढीतल्या एका दिवाणखान्यातच त्यात चार-दोन हातमाग टाकले. आणि स्वेटर विणायची फॅक्टरी खोलली. ह्या कामासाठी आता त्यानं साऱ्या कुटुंबालाच वेठीला धरलं. वृद्ध आई, उतरलेली पत्नी, तरणाताठा पण वेडसर पोरगा कुणीच ह्या वेठबिगारीतून सुटू शकलं नाही. कर्जफेडीसाठी पैसा—पैशासाठी व्यवसाय. व्यवसाय म्हणून स्वेटर विणायचं काम. चोवीस तास काम आणि नुस्तं काम. काउण्टला याखेरीज दुसरं काहीच सुचत नव्हतं.

कर्जफेडीच्या ध्यासानं पछाडलेल्या काउण्टचं काळानं कधीच एका कर्दनकाळात रूपांतर केलं होतं. तो स्वभावानं विलक्षण चिडचिडा होऊन गेला होता. क्रोधानं करपला होता. स्वतः गुरासारखा राबत होताच आणि इतरांनाही तितकाच राबवूनही घेत होता. त्याच्यापाशी आता दया—मायेचा अंशही उरला नव्हता. पोटचा पोर अतिश्रमानं मूर्छित झाला तर हा क्रूरकर्मा बाप त्याला थोबाडून, मारून भानावर आणत होता आणि वर अधिक स्वेटर विणण्याची शिक्षा निर्दयपणे सुनवीतही होता. बायकोनं त्याला सैतान म्हणून हिणवणं अगदी स्वाभाविक होतं; पण पिंगट दाढीचा, तारवटलेल्या लालसर नजरेचा हा काउण्ट खरोखरच एखाद्या सैतानासारखाच हात धुऊन त्या साऱ्या कुटुंबियांमागं लागला होता हेच खरं. ते सारेजण त्याच्या नजरेलाच घाबरून होते. त्याच्या शब्दाबरहुकूम चालत होते. त्याच्या कठोर तालावर नाचत होते. त्या साऱ्यांवर त्या एकाचीच अनिर्बंध सत्ता चालत होती. पैसे आणि पैसेच मिळविण्याच्या वेडानं पछाडलेला काउण्ट स्वतःही ह्याला अपवाद नव्हता. तोही ढोरासारखा राबत होता. लोकर विणत होता. पॅकिंग्ज पार पाडत होता. घोडा नसलेली गाडी, माल लादून दुकानापर्यंत स्वतः कष्टानं ओढून नेत होता. मग वसुलीही नेटीनं करत होता. फ्रँक—फ्रँकसाठी पोटतिडकीनं झगडत होता आणि इतरांनाही झगडायला लावत होता. काउण्टक्लेराम्बर्दच्या जाचाला त्या गढीतले सारेचजण कंटाळून गेले होते.

काउण्टचा छळवादीपणा घरातल्या साऱ्याच घटकांना त्रस्त करून सोडत होता आणि त्याचा विलक्षण नादिष्टपणा गढीबाहेरच्या गावकऱ्यांनाही त्याच्या झळा

पोहोचवत होता. एके काळी कुत्र्या-मांजरांवर जीव टाकणारा काउण्ट आता कुठल्याही कुत्र्या-मांजरांच्या नुसत्या दर्शनानंही समूळ संतापत होता. आपल्या तावडीत सापडणाऱ्या कुत्र्या-मांजराला बंदुकीच्या बारानं लोळवूनच तो थांबत नव्हता, तर त्या मारलेल्या जनावराचा रस्सा करून तोच साऱ्यांना सक्तीनं खायलाही लावत होता. अन्नाचा खर्च वाचवण्याचा हा प्रकारच मुळी विलक्षण किळसवाणा होता. सारा गावच मुळी काउण्टच्या नादिष्टपणावर अती उखडून होता. कुत्र्या-मांजरांनादेखील त्याच्या वागण्याचा वास येई आणि काउण्ट दिसताच तीही बघता बघता त्याच्या नजरेपार नाहीशी होत. कुटुंबियांनाही हे सारं मानवत नव्हतं. कोणी काहीबाही कुरकुरलाच तर काउण्टच त्यांना वर सुनवायचा, 'चारशे वर्षांपूर्वी दुष्काळात माझे पूर्वज उंदीरच नव्हे तर घुबडंदेखील मारून खाऊन जगले !'

आपल्या साऱ्या दुःखांचं, श्रमांचं कारण म्हणजे आपला तोतरा आणि अर्धवट पोरगा व्हिस्काउण्टी, हीच काउण्ट क्लेराम्बार्दची धारणा होती. तो जरा शहाणा-सुरता असता, चार यत्ता शिकला असता तर आपल्यासारख्या खानदानी पुरुषावर ही पाळी आली नसती, हीच तर त्याची खरी खंत होती. काउण्टच्या क्रूरपणाला कंटाळलेले, मनातून त्याला विलक्षण टरकून होते. ते मनोमन त्याचा द्वेषही करायचे. शिव्या द्यायचे; पण त्याच चार-चौघांत काउण्ट मात्र बिनधोक वावरायचा.

काउण्ट क्लेराम्बर्दची ही आर्थिक हलाखी पाहून, गावातलाच एक श्रीमंत वकील एक डाव टाकतो. आपल्या अत्यंत कुरूप पोरीला, काउण्टच्या वेडसर पोराच्या गळ्यात बांधून त्या बदल्यात काउण्टच्या कचकचीत कर्जाची सारी जबाबदारी उचलायला तयार होतो. ह्यासाठी तो गावातल्या, त्यातल्या त्यात जबाबदार आणि आदरणीय व्यक्ती म्हणून फादरना पुढे घालतो. ह्या कठीण कामगिरीवर निघालेला फादर, काउण्टच्या गढीत येऊन पोहोचतात तर काउण्ट त्यांनाच चार उभे-आडवे शब्द सुनावतो. 'तुमची प्रवचनं ऐकायला इथं कुणाला सवड आहे?' तरी फादर नेटानं आपली योजना पुढं सारतात तर काउण्टच्या सुज्ञ पत्नीला मुलाच्या लग्नाची ती कल्पना एकदम पसंत पडते. ती काउण्टला समजावते, 'कर्ज फेडायची अशी सुवर्णसंधी दारात चालून आलीय, ती का म्हणून अशी-तशी गमवायची?' मनापासनं सुखावलेला व्हिस्काउण्टी म्हणतो, 'मला फक्त एक बायको हवीय. आंधळी, पांगळी, लंगडी, मुकी, बहिरी, भले कशी का असेना, कंटाळलोय मी ह्या गुलामगिरीला! मला सुटका हवीय ह्यातून एकदा!' काउण्ट आतून कुठे तरी ताठच असतो.

कुणाच्या भावनांची त्याला कदर नसते. शिवाय नेमका कुळाचा अभिमानही आता उसळी मारून जिभेवर येऊन बसतो आणि मग म्हणतो 'ही कुठची कोण पोर. उद्याची काउण्टेस म्हणून मुळीच शोभायची नाही!'

काउण्ट तेथून तरातरा चालता होतो आणि मग मात्र फादरच्याचबरोबर आलेल्या कुत्र्याला गळफास लावून ठार करतो! लग्नाची योजना घेऊन आलेले फादर जीवनातला एकमेव साथीदार गमावल्याबद्दल खेद करतच गढीबाहेर होतात! त्या विक्षिप्त, वेडया सरदाराच्या लहरीपणानं आणखी एका जिवाचा निरर्थक बळी घेतलेला असतो!

रॉबर्टची ही चित्रपटकथा आता वास्तव आणि अवास्तवात हेलकावे खाऊ लागते. म्हणूनच तेवढयात तिथे एक चमत्कारिक घटना घडून जाते. काउण्टच्या मोडकळीस आलेल्या घराच्या छपराचा एक भाग कोसळतो. त्या ढिगाऱ्यातून एक काळया वेषातला, बुरखाधारी अचानक अवतीर्ण होतो. तो काउण्टला सांगतो, 'मी फ्रान्सिस ऑफ ॲसिसी आहे. क्लेराम्बर्द, तू निरपराध प्राण्यांची हत्या का करतोस? त्या निष्पाप जिवांवर तू प्रेम करायला शीक!' एवढं सांगून तो देवदूतासारखा माणूस त्याला एक पुस्तक बहाल करतो आणि अचानक नाहीसा होतो. तेवढयात फादरांचा मेलेला कुत्रा तिथं परत येतो. साऱ्या घटनाच विलक्षण वाटतात.

काउंट आपल्या वेडसर मुलाच्या तोंडी ऐकतो की, फ्रान्सिस ऑफ ॲसिसी बाराव्या शतकातला एक महान संत होऊन गेला. मग काउंट कुतूहलानं सेंट फ्रान्सिसचं ते चरित्र वाचायला घेतो. पुढले दोन दिवस तो स्वतःला एकांतात कोंडून घेतो. अन्न-पाणी सारं विसरतो. वाचत जातो. सेंट फ्रान्सिसनं निसर्गावर, प्राण्यांवर, पशु-पक्ष्यांवर प्रेम केलं. त्यांची भाषा त्यानं जाणून घेतली. त्यांनाही तो परमेश्वराचीच लेकरं मानत होता. एकंदर ह्या पुस्तकानंच काउंटला पुरतं झपाटून टाकलं. इतकं की, त्याच्या या काळजीनं भयभयीत झालेल्या पत्नीलाही त्यानं ते वाचायचा आग्रह केला.

ह्या साऱ्याच प्रकरणात काउंट पुरता पालटून जातो. स्वेटर-खरेदीला आलेल्या गावातल्या वेश्येला, फ्लाउंड्रेसला तो एक स्वेटर कधी नव्हे तो कमी किंमतीला देऊन टाकतो. कोळयाला मारायला निघालेल्या बायकोलाच रागावतो. आणि परमेश्वरानं निर्मिलेल्या त्या क्षुल्लक कीटकाची क्षमा मागतो. काउंटमधला हा बदल भयंकर विसंवादी आणि म्हणूनच कुणाला न पटणारा ठरतो. बायको तर त्याला म्हणते देखील 'हे काय नवं खूळ मांडलंय!' पण काउंटचं हे हे खूळ असं तसं जाणारं नसतं. आतापर्यंत क्रूरात जमा होणारा, कुत्री-मांजरं मारून खाणारा, बायका-पोरांना राबवणारा हा सरदार आता भलेपणाची कास धरू पाहतो. मनाच्या मर्यादा विशाल करतो. दुसऱ्यांच्या भावनांची बूज राखू पहातो. काउण्टच्या ह्या भूमिकेला अनुसरून तो आता आपल्या वेडसर मुलाची आंतरिक इच्छा जाणून घेतो. त्याच्या फ्लाउंड्रेससारख्या वेश्येवर असलेल्या प्रेमालाही तो संमती देऊन टाकतो आणि गोंधळून गेलेल्या आपल्या पत्नीला निर्धारानं सांगतो, 'मी आता फ्लाउंड्रेसलाच सून करून घेणार आहे!' वेश्येशी संबंध जोडण्याच्या नुसत्या कल्पनेनंच ती भली स्त्री समूळ हादरते. काउंटच्या कल्पनेला ती कडाडून विरोध करते तर काउण्टच तिला समजावतो, 'व्हिस्काउण्टीचं तिच्यावर प्रेम आहे आणि अखेर तीही एक स्त्रीच आहे. एकाच्याच नव्हे तर अनेकांच्या सुखासाठी तीही झटत आली आहे; म्हणून खरं तर ती ह्या शहरात परमेश्वराच्या सर्वाधिक जवळ आहे!' काउण्ट एवढं बोलूनच नुसता थांबत नाही. तो हा विचार कृतीत आणायचं ठरवतो. त्यासाठी लगोलग शहरात जातो. वेडया फ्लाउण्ड्रेसची भेट घेतो. ती त्याच्या विचाराला विरोध करते; पण अखेर काउण्ट क्लेराम्बर्द आपली कल्पना तिला पटवण्यात यशस्वी होतो. ती वेश्या व्यवसायात गुंतलेली स्त्री

सरदाराच्या मुलाशी लग्न करायला होकार भरते.

काउण्टमधला बदल लोकविलक्षण असतो पण त्याला कारण असलेल्या गोष्टी मुळात चमत्कार नसतातच. कारण काउण्टच्या कुत्र्यांना मारण्याच्या क्रूरतेला कंटाळलेल्या एका शेजाऱ्यानंच संन्याशाच्या वेशात फ्रान्सिस ऑफ ॲसिसीचं चरित्र चमत्कारासारखं तो सुधारावा म्हणून दिलेलं असतं आणि फादरचा कुत्रा काउण्टनं मुळात मारला नसल्यानं, कुत्रा जिवंत होण्याचा चमत्कारही नकलीच निघतो; पण आता काउण्टही मागे वळून पहायला तयार नसतो. त्याच्या दृष्टीनं घडलं ते भलं खोटं का ठरेना, आता खरोखरीच माणसांना ओळखण्याची, त्यांच्यावर मनापासून प्रेम करण्याच्या जाणिवेनंच त्याला पुरतं झपाटलं असतं. म्हणूनच त्याच्या डोक्यातलं हे नवं वेड काढण्याचा त्याच्या बायकोचा प्रयत्नही वृथाचं ठरतो.

क्रूर काउण्टमधला बदल गावातले लोक त्याचं नवं खूळ समजतात आणि त्यातनं आपल्या मुलीला नाकारून काउण्ट एका वेश्येला सून करून घेत असल्याची बातमी ऐकताच गावातला तो श्रीमंत वकील खवळतो की आपल्या तिन्ही मुलींना घेऊन गढी गाठतो काउण्टच्या बायकोला बजावतो, 'तो वेडा झालाय! तुम्ही त्याला हॉस्पिटलमध्ये टाका आणि माझ्या मुलीला सून करून घ्या!' पण तेवढ्यात खुद्द काउण्टच तिथे येऊन पोहोचतो आणि त्याचं नवं वागणं पाहताच तो वकील स्वतःच मुलीला घेऊन निघून जातो. काउण्ट बदलत नाही हे पाहताच तो श्रीमान वकील फ्लाउण्ड्रेसलाच फितवायचा प्रयत्न करतो. ती भली वेश्या व्हिस्काउण्टीशी आपलं लग्न नक्की झाल्याचं सांगून त्याला नामोहरम करून टाकते.

काउण्ट क्लेरम्बर्द आता येवेढ्यावरच थांबणार नसतो. भलेपणाची ती नशाही त्याला चांगलीच बाधलेली असते. आपल्या सर्वस्वाचा त्याला वीट येतो. तो आता ह्या नव्या भूमिकेत जसा कोळी, कुत्र्या, मांजरांवर प्रेम करतो, त्यांना खाऊ–पिऊ घालतो तसाच तो आपली परंपरागत प्राणप्रिय गढीही विकायला काढतो. त्यातून आपली सारी कर्ज चुकती करतो आणि आणखी उरलेले तेराशे फ्रँकदेखील चर्चबाहेरच्या भिकाऱ्याला दान देऊन टाकतो. भिकाऱ्यांना देखील ते दान घेताना विलक्षण संकोच वाटतो.

कफल्लक काउण्टला आता घर-दार असत नाही. अशा परंपरागत घरात रहायची इच्छाच रहात नाही. तो स्वतःच एक लाकडी घोडागाडी बनवतो आणि त्यातून प्रवास करीत करीत निसर्गाच्या सान्निध्यात दिवस घालवायचं ठरवतो. तोवर आणखी एक चमत्कारिक घटना घडून जाते. काउण्टचा वेडसर मुलगा, त्याच घोडागाडीत, श्रीमंत वकिलाच्याच दुसऱ्या पण सुंदर मुलीवर अतिप्रसंग करतो. परिणामी काउण्ट वेश्येचा विचार बाजूला ठेवतो व वकिलाच्या त्या सुंदर पोरीशी-ब्रिगेटीशीच आपल्या मुलाचा विवाह ठरवून टाकतो.


काउण्ट क्लेरम्बर्दच्या बाबतीत अनेक प्रश्नांचा गुंता अचानक सुटतो. तो फ्लाउण्ड्रेसला म्हणतो, 'तू तर आता माझ्या मुलीसारखीच आहेस. तूही माझ्याबरोबर निसर्गाकडे चल!' पण फ्लाउण्ड्रेसला ती कल्पनाच नकोशी होते. आधीच स्वतःच्या पापीपणाची जाणीव तिला मनोमन पोखरून काढीत असते. काउण्टसारख्या सज्जन माणसाला आपल्या पापी साहचर्यानं उगाचच का कलंकित करायचं? ती तिथून पळ काढते. ती गेल्याचं पाहताच काउण्ट पिसाळतो. तो घोडागाडी जोडतो आणि फ्लाउण्ड्रेसच्या शोधात सुसाट पळवतो. तेवढ्यात काउण्ट वेडा झाला म्हणून त्याला तपासण्यासाठी वकील एका डॉक्टराला घेऊन तिथे येतो व बेभान काउण्टच्या मागे आपली मोटारगाडी सोडतो.

गावातल्या मध्यवर्ती चौकात फ्लाउण्ड्रेस काउण्टला सापडते. तोवर तिचाही विचार बदललेला. ती काउण्टबरोबर जायचं ठरवते. आता काउण्टला त्या घोडागाडीला धावाच बसवल्या नसल्याचं आठवतं; पण तो सर्वस्वाचं दान करून मोकळा झालेला. म्हणजेच सर्वस्वी कफल्लक. म्हणून मग काउण्ट लोकांच्या सत्प्रवृत्तीलाच आवाहन करायचं ठरवतो. तो परमेश्वरासाठी लोकांकडे दान मागतो. लोक त्याच्यातला बदल पाहून सुरुवातीला बिचकतात. मग त्याला मदत देतात. आपल्या नवऱ्याला भीक मागताना पाहून काउण्टची पत्नी खवळते. तेवढ्यात तो श्रीमंत वकील म्हणतो, 'तो पुरता वेडा झालाय असं तुम्हाला वाटतं का?' काउण्टेस उत्तरते 'नाही!' तिच्या नवऱ्याबद्दल ती आता पुरती निःशंक असते.

सारा गावच काउण्टभोवती मध्यवर्ती चौकात गोळा झालेला. आता काउण्ट त्या सर्व जमावाला आपल्याबरोबरच निसर्गाकडे म्हणजेच परमेश्वराच्या सान्निध्यात चलण्याचं आवाहन करतो. साऱ्यांनाच त्याचा प्रामाणिकपणा पटलेला; पण कुणीच जागचं हलतही नाही. तेवढ्यात आणखी एक चमत्कार घडतो. काउण्ट घोड्याला नुस्ती हाक मारतो तर घोडा आपसूक गाडीपर्यंत जातो. त्याच्या मानेवर जू ठेवलं जातं. लगाम बांधले जातात. गाडी आपोआप जोडून तयार होते. तो प्रसंग पाहून सारा जमावच मंत्रमुग्ध होतो. काउण्टचं देवत्व त्यांना क्षणार्धात जाणवून जातं आणि मग सारा गावच त्याच्या मागोमाग निसर्गाकडे जायला निघतो. संभ्रमित फादरदेखील अखेरीस तोच मार्ग अनुसरतो.

काउण्ट क्लेरम्बर्दची कथा इथेच संपते. तिच्यात अनेक विसंवाद असतात. चमत्कारही दिसतात. दिग्दर्शक यीवज् रॉबर्टची ही चित्रपटकथा बऱ्याचदा तर्काच्या वाटांपलीकडून वाटचाल करते. त्यातलं मानुषत्व अखेर अमानुषत्वावर नेहमीसारखंच ठळक मात करताना दिसतं. त्यातूनच नीतिमूल्यांचा पुरस्कार ठळकपणे जाणवत रहातो. ☐

चित्रपट – **क्लेराम्बर्द**
दिग्दर्शक–यीव्हज रॉबर्ट
देश–फ्रान्स



चित्रपट परीक्षण । सदानंद बोरसे

# बदलते रिश्ते

## गप्प राहा आणि भविष्याकडे नजर ठेवा!

"तर जेहत्ते काळाचे ठायी सिमलानगरीमध्ये मनोहर धनी नामे एक तरुण रहात होता. या आपल्या नायकाचं वर्णन पुराणकारांनी कसं केलंय पहा.

चित्रांमाजी हिंदी चित्रकू ।
ऐशा चित्रपटांचा नायकू ।
सर्वगुण समावेशकू । खचितचि असे ।।
दिसण्यात मदन जाण । बळात जणू हनुमान ।
बुद्धीने तपोधन । बृहस्पती जणू ।।

आपला मनोहर धनीसुद्धा या वर्णनाला तंतोतंत उतरतो बरं, महाराजा ! एक दिवस या आपल्या नायकाची सावित्री नावाच्या तरुणीशी धडक होते. त्यातूनच त्या भांडणातून त्यांचे प्रेम जमते. म्हटलच आहे राग ही अनुरागाची पहिली पायरी आहे."

या असल्या थाटात 'बदलते रिश्ते'ची कथा पुढे सरकते.

आणखी एक तरुण सागर—याच वेळी इंग्लंडहून येऊन टपकतो आणि सावित्रीवर मरायला लागतो. आता असा फक्कडसा त्रिकोण तयार झाल्यावर आणखी काय पाहिजे? पण कथालेखक महेंद्र सरल म्हणाले, "पाहिजे, पाहिजे, भविष्य पाहिजे!" मग एक प्रोफेसरमहाशय सावित्रीचे भविष्य सांगतात, "तुला लग्नानंतर चाळीस दिवसात विधवा व्हायचा चान्स आहे." आपल्याकडे सगळ्या सावित्र्या लहानपणापासूनच हुशार ! ही सावित्री पण मग एक आयडिया टाकते – आधी सागरशी लग्न करायचं, चाळीस दिवसांत तो खपला की मनोहरशी लग्न ! (अर्थात भविष्याची कल्पना सागरला देऊनच.) सागरबुवाही 'चला, चाळीस दिवस तर चाळीस दिवस!' म्हणत ते मान्य करतात अन् लग्न होते.

आता भविष्यावर विश्वास ठेवून मनोहरने गप्प बसावे ना; तर ते नाही. त्याने 'प्रयत्नांती—प्रयत्ने वाळूचे' इत्यादी सुभाषिते पाठ केली असल्यामुळे तो सागरला मारण्यासाठी बऱ्याच युक्त्या लढवतो; पण त्याचे हे हीन रूप पाहून सावित्री त्याचा तिरस्कार करू लागते आणि अखेर सागरवर प्रेम करू लागते. तिच्या पातिव्रत्यामुळे मनोहरला माघार घ्यावी लागून तो निघून जातो.

एवढा चित्रपट झाल्यावर 'चला, संपला!' असे म्हणत आम्ही उठू लागलो, तोच आवाज आला.

"ही कथा इथंच संपत नाही बरं, महाराजा ! हे सगळं मनोहरनं मुद्दामच घडवलं होतं—स्वतःहून सावित्रीच्या मार्गातून दूर होण्यासाठी काय नियतीचे खेळ असतात पहा ! ज्याच्यावर तिचं अतिशय प्रेम—"

हे ऐकल्यानंतर मात्र चित्रपट आता खरोखर संपला हे ओळखले आणि प्रत्येक जण आपापल्या image ला जागला आहे, हे पाहून अपेक्षापूर्तीचे समाधान वाटले. हो, नाही तर आपला एवढा चांगला ऋषी कपूर—मनोहरची भूमिका झाली म्हणून काय झालं, एवढा वाईट वागेल ? छे, कल्पनाच सहन होत नाही !

कथेमध्ये दोनच किरकोळ दोष उरले आहेत. एक सागरचे नाव सत्यवान असायला हवे होते. म्हणजे सावित्रीच्या कथेचा संदर्भ पूर्ण झाला असता आणि दोन, मनोहरचे नाव गोपाळ असून तो शेवटी आत्महत्या करतो व त्यातून त्याची महानता सागर (किंवा सत्यवान)—सावित्रीला कळते; निदान त्याचे सगळे नाटक कळल्यानंतर सगळ्यांचा पुन्हा मनोमिलाफ होतो—असा शेवट केला असता म्हणजे 'संगम'चा संदर्भ पूर्ण झाला असता!

दिग्दर्शक आर्. झालानींच्या कामगिरीचे तर किती वर्णन करावे ? भविष्याचा त्यांनी चित्रपटात ज्या योगायोगांसाठी अन् कथेला पुढे न्यायला धक्के मारण्यासाठी वापर केला आहे, तसा एखाद्या कसलेल्या ज्योतिष्यालाही करता आला नसता ! सुरुवातीच्या नामावलीप्रसंगीचे राशिचक्र, एकाच वेळी मनोहर वा सागरला लागू पडणारे सावित्रीचे गीत—'मेरे साँसों को जो महका रही है ये पहले प्यार की खुशबू', किंवा 'ना जाने कैसे पल में बदल जाते है ये दुनिया के बदलते रिश्ते' हे मनोहरची व्यथा प्रगट करणारे गीत अशा जागांची त्यांनी पखरण—उधळण—साठवण—राखवण संपूर्ण चित्रपटात केली आहे. हे करताना सुसूत्रता, तर्कसंगती अशा फुटकळ गोष्टींना त्यांनी अजिबात थारा दिलेला नाही.

ऋषिकपूर सध्या आपल्या भूमिकांबद्दल थोडासा जागृतपणा दाखवतो, हे 'हम किसीसे कम नहीं' आणि 'बदलते रिश्ते' मधील त्याच्या भूमिकांवरून जाणवते. त्याने मनोहरची भूमिका समजून उभी केली आहे. बाकी सावित्री झालेली रीना रॉय छान दिसते व छानछान कपडे घालते. सागर झालेला जितेंद्र तर सुरुवातीपासून शेवटपर्यंत वेडसरच वाटतो. कधीकधी हा वेडसरपणा कमी होतो, कधी वाढतो—एवढाच काय तो फरक. आपल्या त्याच त्या आगाऊपणाने चित्रपटातील पात्रांपासून प्रेक्षकांपर्यंत सगळ्यांच्या डोक्याला वात देणाऱ्या छोटचा पोराच्या भूमिकेत मा. राजू आहेच. त्यात भर घालायला शुभा खोटे, हंगल, शशिबाला सक्सेना इत्यादी मंडळी सिद्ध आहेतच.

चित्रपटातील एकमेव सुंदर गीत म्हणजे—'मेरे साँसों को जो महका रही है, ये पहले प्यार की खुशबू'. पण लता मंगेशकरच्या आवाजात केवळ स्वर्गीय वाटणाऱ्या या गीतामध्ये एका कडव्यासाठी महेंद्रकपूर या गानगर्दभाच्या आवाजाचा वापर करून त्या कडव्याचा चोथा करून टाकला आहे. बाकी गाणी म्हणजे संगीतकार लक्ष्मीकांत प्यारेलाल आणि गीतकार अंजान यांच्या संयुक्त पाटचा.

'बदलते रिश्ते' सारख्या चित्रपटांनी उगे राहून पडद्यावर जे जे होईल ते ते पाहण्यास प्रेक्षकांना शिकवले आहे.